# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ५ वे अंक ७७ शुक्रवार दि.२६ सप्टेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







# ईपीक पाहणीसाठी मुदतवाढ मिळावी अशी सरकारकडे मागणी माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांच्याकडून

## अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी; तात्काळ पंचनाम्याचे निर्देश



लातूर / प्रतिनीधी :- शासकीय मदत किंवा लाभ मिळण्यासाठी अनिवार्य केलेली ईपीक पाहणी करण्यात सध्या अतिवृष्टी, पूरपरिस्थिती आणि इंटरनेट नेटवर्कची उपलब्धता नसणे अशा अनेक अडचणी येत आहेत. त्यामुळे ईपीक पाहणीसाठी मुदतवाढ मिळावी अशी शेतकऱ्यांकडून मागणी होत आहे. या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून शासनाने ईपीक पाहणीसाठी ३० सप्टेंबर ऐवजी ३१ ऑक्टोबर अखेरपर्यंत एक महिन्याची मुदतवाढ द्यावी, अशी सरकारकडे मागणी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तसेच लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केली. आज, गुरुवार, २५ सप्टेंबर रोजी लातूर तालुक्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतपिकांची पाहणी केली त्यांनी महापूर आणि हरंगुळ (बु.) येथील नुकसानग्रस्त भागाला भेट देऊन पाहणी केली, शेतकऱ्यांचे म्हणणे एकुण घेतले. या झालेल्या नुकसानीचे संबंधितांना तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या. अतिवृष्टीमुळे ई-पीक पाहणीला मुदतवाढ देण्याची मागणी सातत्याने सुरू असलेल्या अतिवृष्टी, पूर आणि चिखलामुळे शेतात प्रत्यक्ष जाऊन ई-पीक पाहणी करणे शेतकऱ्यांसाठी अशक्य झाले आहे. या परिस्थितीत ३० सप्टेंबरपर्यंत ई-पीक पाहणी पूर्ण होणे शक्य नसल्याने, त्यासाठी ऑक्टोबर अखेरपर्यंत एक महिन्याची मुदतवाढ द्यावी, अशी मागणी शेतकऱ्याकडून करण्यात येत आहे. मागच्या महिन्याभरापासून लातूर जिल्ह्यात सर्वत्र अतिवृष्टी होत आहे. यामुळे अनेक भागांत शेतात जाणे शक्य होत नाही. वादळ, वारे आणि विजेच्या उपलब्धतेअभावी ग्रामीण भागात इंटरनेट सेवाही विस्कळीत झाली आहे, ज्यामुळे नेटवर्कअभावी ई-पीक पाहणी करणे कठीण झाले आहे. या व्यतिरिक्त, भूमी अभिलेख विभागाकडून नकाशे व्यवस्थित अपलोड न झाल्याने किंवा सॉफ्टवेअरमधील तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांची जमीन दुसऱ्याच ठिकाणी दाखवली जात आहे. अशा अनेक तांत्रिक आणि नैसर्गिक अडचणींमुळे शासकीय मदत किंवा लाभ मिळवण्यासाठी अनिवार्य असलेली ई-पीक पाहणी पूर्ण होऊ शकत नाही. या सर्व बाबी लक्षात घेता, शासनाने ई-पीक पाहणीसाठी एक महिन्याची मुदतवाढ द्यावी, जेणेकरून शेतकरी वेळेत त्यांची पाहणी पूर्ण करू शकतील अशी मागणी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केली आहे.

महापूर येथे ऊस पिकाची पाहणी: माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी प्रारंभी महापूर येथील शेतकरी ओम माने यांच्या शेतात जाऊन अतिवृष्टीने बाधित झालेल्या ऊस पिकाची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना धीर दिला. सतत पाऊस पडत आहे, नदीला पुर येत आहे. अशा कठीण काळात बंधाऱ्यांच्या गेट उघडण्यात अडचण येत आहे. यामुळे बंधाऱ्यांचे पाणी शेतात जाऊन नुकसान होत आहे. या अनुषंगाने महापूर येथील साई बंधाऱ्याला (बरेज) भेट देऊन बंद असलेले एक गेट तात्काळ दुरुस्त करण्याचे निर्देश जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

हरंगुळ (बु.) येथे सोयाबीनचे नुकसान: त्यानंतर, त्यांनी हरंगुळ (बु.) येथील शेतकरी भारत मल्लीकार्जून उटगे यांच्या शेतात जाऊन सोयाबीन पिकाच्या नुकसानीची पाहणी केली. या ठिकाणीही त्यांनी संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना तातडीने नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले. या पाहणी दौऱ्यावेळी लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, जलसंपदा विभागाचे कनिष्ठ अभियंता प्रशांत स्वामी, मंडळ अधिकारी महेश हिप्परगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, लातूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुभाष घोडके, महापूरच्या सरपंच कल्पना संदिप माने, उपसरपंच विजय चव्हाण, महावितरणचे कनिष्ठ अभियंता आळंगे यांच्यासह अनेक स्थानिक पदाधिकारी, शेतकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नालंदा बुद्ध विहार, बोन्सरी गाव (एमआयडीस) येथील विहाराचे बांधकाम अंतिम टप्प्यात

## उर्वरित अपूर्ण काम परिपूर्ण करण्यासाठी समाजातील दानशूर दानदात्यांनी धम्मदान द्यावे.!

नवी मुंबई / के. एच. हनवते :- नालंदा बुद्ध विहार बोन्सारी गाव (एमआयडीसी) येथील बुद्धविहाराचे काम अंतिम टप्प्यात आले असून कुठल्याही राजकीय नेत्यांची मदत न घेता समाजातील दानशूर आणि समाज बांधवांच्या दांनदात्यातूनच हे बुद्ध विहार उभे केले जाते आहे. या बुद्ध विहाराची निर्मिती दिवंगत सर्पमित्र: दीपक गायकवाड भारतीय बौद्ध महासभा हे गेल्या अनेक वर्षापासून प्रयत्नशील होते, त्यांच्या पश्चात आज बोन्सारी गाव (एमआयडीसी) येथे नालंदा बुद्ध विहाराचे काम अंतिम अंतिम टप्प्यात आले असून त्या ठिकाणी अजूनही तथागत भगवान गौतम बुद्धांचा चबुतरा, फरशी आणि रंगरंगोटीचे काम बाकी आहे, त्यासाठी समाजातील दानशूर नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन आर्थिक स्वरूपात धम्मदान देण्यात यावे असे आव्हान समाजसेवक: सतीश खंडाळे, सुनील भोले, सुभाष बलखंडे, गौतम चव्हाण, कल्याणराव हनवते यांनी प्रसिद्धी माध्यमातून केली आहे, त्याक्षणी पाहणी करत असताना भारतीय बौद्ध महासभा शाखा महिला अध्यक्ष : रेखाताई इंगळे आणि संपूर्ण



कार्यकारणी पिराजी धापसे, दिनेश सोनवणे, बंडू अवचार रमल बांधकाम समितीचे अध्यक्ष, व सरचिटणीस कोषाध्यक्ष संपूर्ण कार्यकारणी तसेच बौद्ध बांधव प्रशांत हांडेराव पहाणी करत असताना तो काही क्षण

## उदगीर व जळकोट शहरातील उद्यान विकसित करण्यासाठी प्रत्येकी एक - एक कोटींचा निधी मतदार संघातील उद्यान विकसित करण्यासाठी दोन कोटी रुपयाचा निधी मंजुर; माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांची माहीती



उदगीर/जळकोट :- मतदार संघातील उदगीर व जळकोट शहरातील उद्यान विकसीत करण्यासाठी या भागाचे आमदार संजय बनसोडे हे प्रयत्नशील होते. त्यांच्या पाठपुराव्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागातुम वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत उदगीर शहरातील नगर परिषद अंतर्गत 'नमो उद्यान' विकसित करण्यासाठी एक कोटी तर जळकोट येथील नगरपंचायत क्षेत्रात नमो उद्यान विकसित करण्यासाठी एक कोटी असे दोन कोटी रुपयाच्या निधीस शासनाने मान्यता दिली असुन सदर उद्यान विकसित करण्यासाठी उदगीरला एक कोटी व जळकोट शहराला एक असे दोन कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी दिली आहे. राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान देण्यात येते. सदर शासन निर्णयांच्या अनुषंगाने वैशिष्ट्यपूर्ण या योजनेअंतर्गत राज्यातील नगर परिषद व नगर पंचायतीमध्ये एक उत्कृष्ट उद्यान विकसित करुन शहरातील नागरीकांना चांगल्या दर्जाची उद्याने उपलब्ध व्हावीत या उद्देशाने सदर उद्याने विकसित करण्यात येणार असुन विकसित करण्यात आलेल्या उद्यानांची विभाग स्तरावर स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे व राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान देण्यात येणार असुन सदर योजनेंतर्गत प्रत्येक नगर परिषद व नगर पंचायतीस उत्कृष्ट उद्यान विकसित करण्याकरीता एक कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

विकसित करण्यात आलेल्या नमो उद्यानांची विभागीय स्तरावर स्पर्धा आयोजित करण्यात येणार असून स्पर्धेबाबतचे निकष स्वतंत्र आदेशान्वये निर्गमित करण्यात येणार आहेत.

नमो उद्यान स्पर्धेतून प्रत्येक प्रशासकीय विभागाअंतर्गत तीन उद्यानांची निवड करण्यात येणार आहे व प्रथम नमो उद्यानाचा मान मिळविण्याऱ्या नगर परिषद किंवा नगर पंचायतीस पाच कोटी रुपयाच्या निधीची कामे वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून मंजूर करण्यात येणार आहेत तसेच द्वितीय व तृतीय नमो उद्यानाचा मान मिळविणाऱ्या नगरपरिषद / नगरपंचायतीस अनुक्रमे तीन कोटी व दोन कोटी रुपयांच्या निधीची कामे मंजूर करण्यात येणार असल्याने आपल्या उद्यानाचे काम हे दर्जेदार व गुणवत्तापुर्ण करुन आपण या स्पर्धेत आपला सहभाग नोंदवणार असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले आहे. उदगीर व जळकोट शहरातील उद्यानासाठी सदर निधी मंजूर केल्याबद्दल आ.संजय बनसोडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार व्यक्त केले आहेत. उदगीर व जळकोट येथे उद्यानासाठी निधी मंजूर केल्याने माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांचे उदगीर व जळकोट तालुक्यातील नागरिकांनी अभिनंदन करुन आभार व्यक्त केले आहेत.

# लातूर जिल्हा पोलीस अधिकारी व कर्मचारी सहकारी पतसंस्थेचा बळीराजाला मदतीचा हात सर्व स्तरातून कौतुक



लातूर :- लातूर जिल्हा पोलीस अधिकारी व कर्मचारी सहकारी पतसंस्थेचा बळीराजाला मदतीचा हात सर्व स्तरातून कौतुक

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक २४/०९/२०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा लातूर जिल्ह्यातील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या भागाचा पाहणी दौरा आयोजित करण्यात आला होता. मागील काही दिवसांपासून राज्यात, विशेषतः मराठवाड्यात पावसानं शेतकऱ्यांचं मोठ नुकसान झालं आहे. या संकटाच्या काळात शेतकऱ्यांना थोडासा मदतीचा हात मिळावा आणि आपणही समाजाचा एक घटक आहोत आपली समाजाशी बांधिलकी आहे. या जाणिवेतून लातूर जिल्हा पोलीस अधिकारी व कर्मचारी सहकारी पतसंस्था यांनी पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून मदतीकरिता खारीचा वाटा उचलण्याचे ठरवले त्याचाच एक भाग म्हणून...

लातूर जिल्हा पोलीस अधिकारी व कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. लातूर यांच्या वतीने १,११,१११/- (एक लाख अकरा हजार एकशे अकरा रुपये) इतकी मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्याकरिता धनादेश राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे, पोलीस पतसंस्थेचे अध्यक्ष परमेश्वर ढेकणे, सचिव नामदेव सारोळे, गोविंद सरोदे, अयुब शेख, काझी, रवी कांबळे, माधव केंद्रे, श्रीमती दीपा शिवलकर व अनुराधा मेहकर हे हजर होते.

# जिल्हा रुग्णालय उभारणीचा मार्ग मोकळा

## मुख्यमंत्र्यांकडून विशेष बाब म्हणून मान्यता; शहर जिल्हा भाजपाने मानले आभार

लातूर / प्रतिनिधी :- लातूर येथे जिल्हा रुग्णालय उभारणीस यापुर्वी मान्यता मिळाली होती. मात्र सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील काही आरोग्य केंद्रे, उपजिल्हा रुग्णालय व जिल्हा रुग्णालय यांच्या बांधकाम पक्रीयेस स्थगिती दिली होती. परिणामी लातूर येथे जिल्हा रुग्णालय उभारण्यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात यावी अशी मागणी शहर जिल्हा भाजपाच्या वतीने जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे केली होती. तसेच यासाठी पाठपुरावा करण्यात येत होता. याबाबत जिल्ह्यातील भाजपा लोकप्रतिनिधींसह माझे लातूर परिवाराने पाठपुरावा केलेला होता. या पाठपुराव्यास यश आले असून लातूर जिल्हा रुग्णालय उभारणीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष बाब म्हणून मान्यता दिली असल्याने शहर जिल्हा भाजपाने मुख्यमंत्र्यांसह पालकमंत्री व जिल्ह्यातील भाजपा लोकप्रतिनिधींचे आभार मानले आहेत.

लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारल्याने येथील जिल्हा रुग्णालयाचे अस्तित्व संपुष्टात आलेले होते. लातूर येथे जिल्हा रुग्णालय नसल्याने शहरासह जिल्ह्यातील व परजिल्ह्यातील रुग्णांची गैरसोय होऊन त्यांची मोठी अडचण होत होती. लातूर येथे जिल्हा रुग्णालय उभारण्यात यावे याकरिता सातत्याने पाठपुरावा सुरु होता. जिल्हा रुग्णालय उभारण्यास मंजुरी मिळाल्यानंतर जागेअभावी त्याच्या कामास सुरुवात झालेली होती. सदर अडचण लक्षात घेऊन तत्कालीन पालकमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी कृषी महाविद्यालयाची जागा जिल्हा रुग्णालयास उपलब्ध करून दिलेली होती. मात्र आरोग्य विभागाकडून या जागेसाठी आवश्यक असलेली रक्कम कृषी विभागाला वर्ग केली नव्हती. यासाठी पाठपुरावा झाल्यानंतर रक्कम जमा झाली मात्र पुन्हा एकदा जिल्हा रुग्णालय उभारणीसाठी शासन निर्णयाची अडचण आली. सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील काही प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपजिल्हा व जिल्हा रुग्णालय यांच्या बांधकामास स्थगिती देण्याचा निर्णय घेतला होता.



लातूर येथे जिल्हा रुग्णालय नसल्याने रुग्णांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन तात्काळ जिल्हा रुग्णालय उभारण्यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात यावी अशी मागणी शहर जिल्हा भाजपाच्या वतीने जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे केली होती. याबाबत शहर जिल्हा भाजपासह जिल्ह्यातील भाजपा लोकप्रतिनिधी व माझे लातूर परिवाराने सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर या पाठपुराव्याला यश आलेले असून पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या पुढाकारातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूर येथे जिल्हा रुग्णालय उभारण्यास विशेष बाब म्हणून प्रशासकीय मान्यता देण्याचा शासन निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे आता लातूर येथे जिल्हा रुग्णालय उभारणीचा मार्ग मोकळा झाला असल्याने शहर जिल्हा भाजपाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले व जिल्ह्यातील भाजपा लोकप्रतिनिधींचे जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी आभार मानले आहेत. तसेच जिल्हा रुग्णालय बांधकामाचा भुमीपुजन सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत लवकरच पार पडेल असा विश्वास जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केला आहे.

## निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय !
## मतमोजणीबाबतचा 'हा' नवा नियम जारी

नवी दिल्ली : केंद्रीय निवडणूक आयोगाने २४ तासांत दुसरा महत्त्वपूर्ण निर्णय घेत मतमोजणी प्रक्रियेत पारदर्शकता आणि शिस्त आणण्यासाठी पावले उचलली आहेत. मतदारयादीतील नावे वगळण्याच्या प्रक्रियेत सुधारणा केल्यानंतर आता आयोगाने मतमोजणीच्या नियमांत बदल करत एक महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे. नव्या निर्णयानुसार, पोस्टल बॅलेटची मतमोजणी पूर्ण होईपर्यंत इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (एतच्) च्या शेवटच्या दुसऱ्या फेरीची मतमोजणी सुरू करता येणार नाही. यापूर्वी एतच् ची मतमोजणी पोस्टल बॅलेटची मोजणी पूर्ण होण्याआधी सुरू होऊ शकत होती, ज्यामुळे काही वेळा संभ्रम आणि वाद निर्माण होत होते. या नव्या नियमामुळे अशा तक्रारी आणि आरोप-प्रत्यारोप टाळण्यास मदत होईल. गेल्या काही निवडणुकांमध्ये पोस्टल बॅलेटच्या मतांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. विशेषतः दिव्यांग मतदार आणि ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी घरबसल्या मतदानाची सुविधा उपलब्ध झाल्याने ही वाढ दिसून आली आहे. या पार्श्वभूमीवर, पोस्टल मतांची मोजणी अचूक आणि जलद व्हावी यासाठी आयोगाने नव्या सूचना जारी केल्या आहेत. मतमोजणी केंद्रांवर अधिक टेबल्स आणि कर्मचारी उपलब्ध करून देण्याचे निर्दे श देण्यात आले आहेत. यामुळे पोस्टल मतपत्रिकांची मोजणी वेळेत आणि काटेकोरपणे पूर्ण होईल. या निर्णयामुळे मतमोजणी प्रक्रियेला गती मिळेल आणि अंतिम निकाल जाहीर करण्यास होणारा विलंब कमी होईल. हा निर्णय निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि विश्वासार्हता वाढवण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

# संपादकीय

## भारत-मॉरिशस मैत्रबंधांना नवी बळकटी

मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांच्या भारत दौर्यामुळे या संबंधांना नवी बळकटी मिळाली. हिंद महासागर परिसरात वाढत्या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर दोन्ही पंतप्रधानांची भेट ही प्रादेशिक संतुलन राखण्याच्या आणि जवळच्या भागीदारांच्या विकासासाठी सर्वतोपरी समर्थन देण्याच्या भारताच्या भूमिकेला नवी ऊर्जा देणारी ठरली. भारत – मॉरिशस द्विपक्षीय व्यापार सक्षम करण्यासाठी स्थानिक चलनांचा वापर करतील, अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवीनचंद्र रामगुलाम यांच्याशी झालेल्या विस्तृत चर्चे नंतर सांगितले. हेमंत महाजन, ब्रिगेडियर (निवृत्त) भारत – मॉरिशस हे देश भौगोलिकदृष्ट्या वेगळ्या खंडांत असले, तरी त्यांचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि मानवी नाते अतिशय प्राचीन आहे. १८ व्या आणि १९ व्या शतकात मोठ्या संख्येने भारतीय कामगार आणि व्यापारी मॉरिशसला गेले. साखर शेतीसाठी काम करणारे कामगार हा त्यातील महत्त्वाचा घटक. आज मॉरिशसच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ६८ ते ७० टक्के लोक भारतीय वंशाचे आहेत. त्यामुळे भाषा, धर्म, परंपरा आणि सामाजिक जीवन या सर्वांमध्ये भारतीय छाप दिसून येते. दिवाळी, होळी, गणेशोत्सव असे अनेक सण तेथे मोठ्या प्रमाणात साजरे होतात. या ऐतिहासिक जवळिकीमुळे भारत–मॉरिशस संबंधांना कौटुंबिक स्वरूप आले आहे. १९४८ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आणि १९६८ मध्ये मॉरिशस स्वतंत्र झाल्यानंतर दोन्ही देशांमध्ये औपचारिक राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले.

हिंद महासागरातील एक छोटा द्वीपदेश असलेला मॉरिशस भारताच्या 'शेजार प्रथम' आणि 'सागर' (सिक्युरिटी अँड ग्रोथ फॉर ऑल द रिजन) या धोरणांचा अविभाज्य भाग मानला जातो. आजच्या घडीला भारत– मॉरिशस संबंध हे केवळ प्रवासी भारतीय समुदाय आणि सांस्कृतिक धाग्यांपुरते मर्यादित नसून ते सामरिक, आर्थिक, राजनैतिक आणि तांत्रिक सहकार्याच्या एका विस्तृत परिघात विकसित झाले आहेत. भारताने दीर्घकाळापासून मॉरिशसच्या दाव्याला पाठिंबा दिला. चागोस समुद्री क्षेत्राच्या विकास आणि देखरेखीत भारताची मदत ही केवळ मॉरिशसच्या सार्वभौमत्वाला बळकट करणारी नाही, तर हिंद महासागराला मुक्त, सुरक्षित आणि स्थिर ठेवण्याच्या भारताच्या कटिबद्धतेलाही अधोरेखित करणारी आहे. मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांच्या भारत दौर्यामुळे या संबंधांना नवी बळकटी मिळाली आहे.

हिंद महासागर परिसरात मोठ्या शक्तींमध्ये वाढत्या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर दोन्ही पंतप्रधानांची भेट ही प्रादेशिक संतुलन राखण्याच्या आणि जवळच्या भागीदारांच्या विकासासाठी सर्वतोपरी समर्थन देण्याच्या भारताच्या भूमिकेला नवी ऊर्जा देणारी ठरली. दोन्ही देशांचे नाते केवळ राजकीय मर्यादेत नाही, तर शतकानुशतकांच्या सांस्कृतिक कड्यांशी जोडलेले आहे. 'भारत – मॉरिशस हे फक्त भागीदार नाहीत, तर कुटुंब आहेत' हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलेले वाक्य हाच स्नेह आणि विश्वास प्रकट करणारे आहे. भारताने मॉरिशसला ६८० दशलक्ष डॉलरचे प्रचंड आर्थिक पॅकेज जाहीर केले असून त्यात २५ दशलक्ष डॉलरची बजेटीय मदतही समाविष्ट आहे. हे पॅकेज अनुदान आणि कर्ज या दोन्ही स्वरूपांत विविध प्रकल्पांना गती देणारे आहे.

या योजनांमध्ये पोर्ट लुईस बंदराचा पुनर्विकास, चागोस समुद्री संरक्षित क्षेत्राचा विकास व देखरेख, आंतरराष्ट्रीय विमानतळावरील एअर ट्रॅफिक कंट्रोल टॉवरचे बांधकाम, तसेच राष्ट्रीय महामार्ग व रिंगरोडचा विस्तार यांचा समावेश आहे. या योजना केवळ पायाभूत सुविधांच्या विकासापुरत्या मर्यादित नाहीत, तर त्या मॉरिशसची समुद्री क्षमता वाढवतील, त्याची कनेक्टिव्हिटी सुधारतील आणि आर्थिक विकासाला नवी दिशा देतील. हिंद महासागरातील समुद्री सुरक्षेचे वाढते महत्त्व आणि समुद्री मार्गांवरील नियंत्रण लक्षात घेता हे पाऊल भारताच्या सामरिक हितालाही बळकटी देणारे ठरणार आहे. मॉरिशसच्या पंतप्रधानांच्या दौर्याचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे, चागोस द्वीपसमूहावर दिलेला भर. अलीकडेच मॉरिशसने ब्रिटन सोबत एका करारावर स्वाक्षरी केली आहे. त्यानुसार चागोस द्वीपांवरील मॉरिशसच्या सार्वभौमत्वाला मान्यता दिली आहे, तरीही डिएगो गार्सिया हा महत्त्वाचा सैन्य तळ ब्रिटन आणि अमेरिकेकडेच राहणार आहे. भारताच्या पाठिंब्यामुळे या प्रश्नावर मॉरिशसची भूमिका अधिक सबळ झाल्याचे दिसते. पंतप्रधान रामगुलाम यांनी भारतीय नौदलाच्या जहाजातून चागोस द्वीपसमूहाचा दौरा करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. दोन्ही देशांतील विश्वास आणि सामरिक आकलन किती घट्ट आहे, याचे हे द्योतक आहे. दोन्ही देशांमध्ये अनेक करारांवर स्वाक्षर्या झाल्या असून हे भारत–मॉरिशसच्या बहुआयामी भागीदारीचे प्रतीक आहे. मॉरिशसच्या विशेष आर्थिक क्षेत्रात हायड्रोग्राफिक सर्व्हे आणि नौवहन चार्टिंगमध्ये भारत सहकार्य करणार आहे. यामुळे मॉरिशस आपल्या समुद्री संसाधनांचा अधिक चांगल्या प्रकारे वापर करू शकेल. ऊर्जा आणि वीज क्षेत्रात १७.५ मेगावॅट क्षमतेचा फ्लोटिंग सोलार पॉवर प्लांट उभारण्यावर आणि अंतराळ तंत्रज्ञान क्षेत्रात उपग्रह नेव्हिगेशन व रिमोट सेन्सिंग सहकार्यासंदर्भातही सहमती झाली आहे. भारताने मॉरिशसमध्ये पहिले जनौषधी केंद्र सुरू करण्याची घोषणा केली आहे. मॉरिशस हा हिंद महासागरातील भारताच्या सुरक्षा धोरणाचा एक महत्त्वाचा आधार आहे. हिंद महासागर हा जागतिक व्यापारी मार्गांचा केंद्रबिंदू आहे. जगातील सुमारे ६० टक्के तेल वाहतूक आणि ४० टक्के जागतिक माल वाहतूक या समुद्री क्षेत्रातून होते. या प्रदेशात चीनची वाढती उपस्थिती आणि त्याच्या बंदर प्रकल्पांमुळे भारतासाठी मॉरिशससोबतचे संबंध अधिक बळकट करणे आवश्यक ठरते. पंतप्रधान मोदी यांनी हिंद महासागर मुक्त, सुरक्षित आणि स्थिर ठेवण्याची भूमिका पुन्हा अधोरेखित केली आहे. या प्रदेशात भारत पहिला मदतनीस व सुरक्षा पुरवठादार म्हणून सज्ज असल्याची हमीही पंतप्रधानांनी दिली आहे. भारताचा तेल व माल वाहतुकीचा मोठा हिस्सा हिंद महासागर मार्गावरून जातो. मॉरिशससोबतची भागीदारी या मार्गांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, अलीकडच्या काळात चीनसोबत काहीसे मवाळ धोरण अवलंबल्यानंतर अनेकांना भारताच्या अन्य देशांसोबतच्या संबंधांमध्येही बदल होईल असे वाटले होते; परंतु प्रत्यक्षात भारत अमेरिकेच्या दबंगशाहीला काटशह देण्यासाठी आणि आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सीमावादांवरून निर्माण होऊ शकणारे तणाव टाळण्यासाठी चीनशी चर्चा–संवाद करत आहे. यादरम्यान, व्यापक दृष्ट्या चीनच्या विस्तारवादी धोरणांना लगाम घालण्यासाठीची भारताची भूमिका कायम आहे.

# जातीआधारीत आरक्षण संपवा म्हणणा–या भामट्यांनो....!

संविधानात आरक्षणाचे तत्व आले कसे.? या प्रश्नाचे उत्तर ऊच्च वर्णीय समुहातील सत्ताधारी वर्गाने आणि जाती आधारित आरक्षण संपवा म्हणणा–या अज्ञानी भामट्यांनी समजून घेतले पाहिजे...!!

स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी भारत हे एकसंघ राष्ट्र नव्हते. राजेशाही आणि इंग्रजांचे मांडलिकत्व स्विकारलेल्या तुकड्यांचा हा प्रदेश होता...!! सामाजिक स्तरावर चातुर्वण्य व्यवस्था कार्यरत होती. ब्राम्हण, वैश्य, क्षत्रिय, शुद्र हे वर्ण होते.(आजचे एस. सी. आणि एस. टी. हे अवर्ण होते, म्हणून त्यांना अस्पृश्य मानल्या गेले. करिता अस्पृश्यांना गाव कुसाबाहेर आणि आदिवासी समुहाला डोंगर द–या कपारीत. रहावे लागत होते.)... ..!! प्रत्येक वर्णांचा व्यवसाय आणि अधिकार ठरलेले होते. शिक्षण घेण्याचा आणि ज्ञान देण्याचा फक्त ब्राम्हणांनांच अधिकार होता. म्हणून १६ व्या शतकातील शुद्र असलेल्या संत तुकाराम महाराजांच्या गाथा इंद्रायणी नदीत राजरोस बुडविल्या गेल्या होत्या. किर्तन करुन ज्ञान देण्याचा अधिकार शुद्र असलेल्या आणि आता कुणबी म्हणून घेणा–या ओबीसी समुहातील संत शिरोमणी तुकाराम महाराज यांना नाही हेच मंबाजी भटाचे म्हणणे होते...!! जसा संत तुकाराम महाराज यांना ज्ञान देण्याचा,गाथा लिहण्याचा अधिकार नाही तसाच समाज सुधारक म. ज्योतिबा फुले यांनी निर्माण केलेल्या सत्यशोधकांना चातुर्वण्य व्यवस्थेतील शुद्राला आणि जातीव्यवस्थेतील ओबिसी समुहाला लग्न लावण्याचा म्हणजे धार्मिक विधी करण्याचा सुद्धा अधिकार नाही हे ज्योतिबा फुले यांच्या विरोधात इंग्रजाच्या कोर्टात खटला दाखल करुन ब्राह्मणांनी आपले अधिकार दाखवून दिले होते...!!

जसा किर्तन करणे,गाथा लिहणे संत तुकाराम महाराजांचा अधिकार नव्हता,धार्मिक विधी करणे, म. ज्योतिबा फुले आणि त्यांच्या सत्यशोधकांचा अधिकार नव्हता तसेच राजा होण्याचा अधिकार फक्त क्षत्रियांचा,आहे,शुद्राचा नाही असे म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक नाकारणारे ब्राह्मण महाराष्ट्रातील जनतेने अनुभवले आहेत ही चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील सामाजिक अवस्था होती. म्हणजेच कमालीचा भेदभाव होता,अस्पृश्य, अवर्णांच सोडा.गावकुसाच्या आत राहणारे संख्येने ५४% असलेल्या शुद्र म्हणजेच आजच्या ओबीसी समुहाला फक्त आणि फक्त ब्राह्मण,क्षत्रिय आणि वैश्यांची सेवा करण्याचा अधिकार होता. संपत्ती संचय करण्याचा अधिकार नव्हता.१५% समूहासाठी ८५% समुहावर अन्याय करुन, त्यांचे शोषन करुन मुठभर ब्राम्हण्यवादी लोकांच्या हिताची व्यवस्था राबविल्या जात असे ही परिस्थिती होती. परिणामी कमालीची विषमता समाजात नांदतं होती...!! . भारतीय समाजातील कमालीची विषमता घालवून समता प्रस्थापित केली तरच भारत हे राष्ट्र म्हणून ऊभं राहू शकेल हा मानवतावादी,राष्ट्रहितैषी विचार भारतातील विचारवंत, सुज्ञ, ज्ञानी, धोरणी आणि राजकीय नेत्यांना पटला आणि म्हणून भारताच्या संविधानाची चौकट स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्वावर आधारित बनविल्या गेली.....!!

आपल्या संविधानात आरक्षणाचे तत्व हे सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी आणण्यात आले. ज्या दिवशी सामाजिक विषमता संपली, जाती आधारित भेदभाव संपला जातीच्या नावावर होणारे अन्याय,अत्याचार थांबले, जातीच्या नावाखाली संधी नाकारण्याचं थांबलं, जातं पाहून मुलगी देण्याचं थांबलं,जातं पाहून सुना करण्याचं थांबलं, जातं पाहून पुजारी नियुक्त करण्याचं थांबलं, जात पाहून मतं देण्याचं थांबलं,जात पाहून तोंडी परीक्षेतील गुण देण्याचं थांबलं,जात पाहून युपीएससी मधील मागास जातींच्या उमेदवारांना मुलाखती मध्ये कमी गुण देण्याचं थांबलं, जात पाहून संधी नाकारण्याचं थांबलं,उच्च आणि सर्वोच्च न्यायालयातील न्यायमुर्ती मध्ये सगळ्या जातीचे न्यायाधीश दिसु लागले. पंतप्रधान कार्यालय,राष्ट्रपती,राज्यपाल विधीमंडळ,संसद भवनातील, सचिवालयामध्ये सर्वच जातीचे सचिव दिसु लागले, ईलेक्ट्रॉनिक मिडिया आणि प्रिंट मीडिया मध्ये संपादक,अँकर सर्वच जातीचे दिसू लागले,आपणं सगळे समपातळीवर आलो त्या दिवशी आरक्षणाची गरजच ऊरणार नाही हेच भारतीय संविधानाला अभिप्रेत आहे....!!



भारताचे संविधान बनवितांना २९९ संविधान सभेचे खासदार होते.भारताच्या प्रत्येक प्रदेशातील प्रतिनिधी संविधान सभेत होता. संविधान सभेचे अध्यक्ष काँग्रेस पक्षाचे पुढारी आणि ब्राह्मण समुहाचं प्रतिनिधित्व करणारे डॉ राजेंद्र प्रसाद होते. संविधान सभेत अनेक बॅरिस्टर होते,विद्वान होते.अभ्यासु सभासद होते. ब्राह्मण समुहाच्या हिताचं रक्षण करणा–या काँग्रेस पक्षाचेच बहुमत संविधान सभेत होते...!! संविधानाचे एकेक कलम बनवितांना त्यावर प्रचंड चर्चा होत असे.आणि देशाच्या, समाजाच्या हिताचं असेल तरच ते कलम मंजूर होतं असे. संविधान सभेचे कामकाज कसे आणि किती वेळ चाले त्याचा लेखी सरकारी दस्तावेज उपलब्ध आहे. सत्तेत बसलेल्या आणि आर्थिक निकषांवर आरक्षण असावे अशी मांडणी करणा–या अज्ञानी, लोकांनी तो वाचला पाहिजे आणि मग विधान केले पाहिजे की, जाती आधारित आरक्षण संपवा, आर्थिक निकष लावा....!! मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी घरात बसुन भारताचे संविधान लिहले नाही. संविधान सभेत २९९ खासदारांच्या मंजुरीने,भारतीय संविधानात आरक्षणाचे तत्व आले. आरक्षणातून सामाजिक समता प्रस्थापित करायची आहे, आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी आरक्षण नाही...!! देशात जातीवरून भेदभाव केला जातो. हा विचार आणि सामाजिक वास्तव संविधान सभेने मान्य केले म्हणून आरक्षण हे जाती आधारित या तत्वावर लागू करण्याचे संविधान सभेने मंजुरात देऊन ठरविले आहे...!!

देशात सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी जाती आधारित आरक्षण लागू होऊन ७५ वर्षे उलटून गेली आहेत. राज्यकर्त्या सत्ताधारी लोकांना आमचा सवाल आहे. सामाजिक पातळीवर समता प्रस्थापित झाली का.? आजही ड्रेनेज मध्ये उतरून किती ब्राह्मण, राजपूत, पाटीदार, जैन,मारवाडी,जाट,मराठा,पटेल सफाई कामगार म्हणून काम करतात. आणि जीव गुदमरून मरतात.?सरकारी आकडे जाहीर करा...!! आजही इमारती बांधकाम मजुरांमध्ये, ऊसतोड कामगार मजुरांमध्ये, खाण कामगार मंजुरांमध्ये जीथं जीथं अतिकष्टाच काम करावे लागते त्या ठिकाणी ब्राह्मण, बनिया, राजपूत, ९६ कुळी, सवर्ण मानणा–या किती जातीचे मजूर आहेत. तुमच्या कडे नोंदणी आहे,आकडेवारी जाहिर करा. आणि सामाजिक समता प्रस्थापित झाली हे सिद्ध करा. दरवर्षी किती भंगी, वाल्मिकी तुमचा गु काढतांना जीव गुदमरून ड्रेनेज मध्ये मेले ते तुम्हाला समजेल. पिढ्यानपिढ्या तुमचीच घाण ओढून मरणारे त्यांच्या संख्येच्या प्रमाणात शिक्षण, नोकरीच्या जागा,आणि राजकीय प्रतिनिधित्व मागतात. तुमच्या वाट्याच्या नाही.आणि त्यांच्या पैकी केवळ १ ते १.५ टक्का समुहाकडे आर्थिक स्त्रोत निर्माण झाला तर तुमच्या पोटात दुखायला लागले.? किती ही अमानुषता.? ही मानसिक विकृती नाही का.? ही विद्वेषी भावना नाही का.?

सत्ताधारी सवर्ण वृत्तीच्या राज्यकर्ते लोकांनी जाती आधारित आरक्षण संपवा असा प्रचार करण्याच्या अगोदर स्वतः ला माणूस म्हणून सिद्ध करायला शिका. तुमचं वर्तन व्यवहार आणि नितीमत्ता जनावरांना लाजवेल एवढी हीन दर्जाची दिसतेय...!! तुम्हाला सामाजिक विषमता हवी की,सामाजिक समता हवी हे एकदा जाहीर करा. तुम्हाला सामाजिक समता नको असेल तर मग तुम्ही संविधान विरोधी, मानवता विरोधी,राष्ट्रविरोधी विषमता वादी आहात हे आपसुकच सिद्ध होतं आहे...!!

स्वांतत्र्याला ७५ वर्षे उलटून गेली आहेत. संविधान लागू होऊन ७५ वर्षे झाली आहेत. राज्यकर्ते तुम्हीच आहात तरीही तुम्हाला विषमता संपू द्यायची नाही. हे तुमच्या राज्य कारभारा वरुन आणि धोरणावरुन लक्षात येत आहे....!!

ऊच्च आणि सर्वोच्च न्यायालयात किती शुद्र अर्थात ओबीसी न्यायाधीश आहेत? देशातील सर्वच सचिवालयात मुख्य सचिव,ऊप सचिव किती ओबीसी आहेत? इलेक्ट्रॉनिक मिडिया प्रिंट मीडिया मध्ये किती चांभार,मातंग आणि न्हावी,कुंभार, मागगारुडी,बंजारा,वंजारी,नंदीबैलवाले,डोंबारी, आणि तत्सम जातीचे संपादक,अँकर आहेत.?एकदा आकडेवारी जाहिर करा आणि देशात सामाजिक समता प्रस्थापित झाली हे सिद्ध करा आणि मग जातिगत आरक्षण संपवण्याची भाषा वापरा....!!

सामाजिक समता प्रस्थापित होऊ द्यायची नाही म्हणून तुमचा आटापिटा चालला असेल तर म. ज्योतिबा फुले सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचं बीजारोपण केलं.डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी त्या बीजाला संवैधानिक खतपाणी घातलं आता जागृतता वाढते आहे. तुम्ही फक्त १५% आहात सामाजिक भेदभाव सहन केला जाणार नाही. तुमची विद्वेषी भावना ठेचून काढायची तरुणांमध्ये जागृती येतं आहे. तुमची अमानुषता खपवून घेतली जाणार नाही हेही लक्षात घ्या...!!

सामाजिक समता प्रस्थापित झाल्याशिवाय जाती आधारित आरक्षण संपणार नाही हेही संविधान विरोधी विषमतावादी मुठभर विद्वेषी लोकांनी समजून घेतले पाहिजे....!!

***********

लेखक –भास्कर भोजने.
जिल्हा. अकोला
मो. नं. ९९६०१३२४७५

# उच्च विद्या विभूषित सायबर चोर... !

बुद्धिजीवी उच्चशिक्षितच सायबर भामट्यांच्या गळाला! डिजिटल अरेस्ट असते का कधी ? हा केवळ फसवणुकीचा फास कोल्हापुरात फसगतीच्या घटनांत वाढ. कोल्हापूर : विमानतळावर तुमच्या नावाने अमली पदार्थाची पार्सल आली आहे ,तुमच्या बँक खात्याचा अतिरेक्यांना पैसे पाठवण्या साठी उपयोग झाला आहे. अशा भूलथापा मारून सायबर भामटे बुद्धिजीवी आणि उच्चशिक्षित नोकरदारांना हातोहात फसवत आहेत. गेल्या दोन अडीच वर्षात कोल्हापूर जिल्ह्यात किमान १५ कोटीच्या गंडा सायबर भामट्यांनी घातला आहे .

डॉक्टर पिता पुत्रांनाही दिनांक २८ ऑगस्ट २०२५ रोजी ४२ लाखांना फसवले. वास्तविक डिजिटल अरेस्ट हा काही प्रकारच नसतो. आता आजपर्यंत जगात कोणालाही अशी अटक झालेली नाही ; मग लोक का घाबरतात ? असा प्रश्न पडतो. ' कर नाही त्याला डर कशाला ' अशी हिम्मत दाखवणे गरजेचे आहे . आर्थिक व्यवहार ऑनलाइन झाल्यापासून सायबर भामट्यांनी डोके वर काढले आहे. वेगवेगळी कारणे सांगून ते लोकांच्या कष्टाच्या पैशावर ऑनलाइन दरोडे टाकत आहेत .सर्वसामान्य लोकांना कायद्याची अटकेची बदनामीची भीती दाखवून ते आर्थिक लुबाडणूक करत असल्याचे दिसून आले आहे.

या सायबर चोरट्यांनी आपले जाळे इतके विस्तारले आहे की गुन्हे दाखल झाल्यानंतर पोलीस त्यांच्या पर्यंत पोहोचणार नाहीत किंवा पोहचलेच तर हाती काहीच लागणार नाही अशी तगडी व्यवस्था या भामट्यांनी केली आहे. मुंबई विमानतळावर तुमच्या नावाने पार्सल आले असून त्यामध्ये अमली पदार्थ असल्याची भीती दाखवून भामट्याने एका महिलेस २० लाखाचा गंडा घातला. त्यानंतर जिल्ह्यातील नामवंत उद्योजकांना घरात नजर कैदेत ठेवून लाखोला ऑनलाइन लुबाडले. सेवानिवृत्त प्राध्यापकेस साडेतीन कोटीना फसवले. त्यानंतर संगणकातील तज्ञ व्यक्तीला साडेसात कोटीचा चुना लावला.

नामावंत डॉक्टर पिता पुत्रांनाही त्यांनी ४३ लाखांना गंडवले . गेल्या अडीच वर्षात कोल्हापुरात फसवणुकीच्या अशा घटना घडल्या आहेत.✻ डिजिटल अरेस्ट केवळ थोतांड ! व डिजिटल अरेस्टला कायद्यात कुठलेही स्थान नाही. डिजिटल अरेस्ट म्हणजे कुठल्याही प्रकारची अटक नसते . हा फक्त सायबर भामट्याने टाकलेला मानसिक दबाव असतो. कुठलीही तपास यंत्रणा म्हणजेच पोलीस , सीबीआय , नार्कोटिक्स किंवा आणखी कुठलीही तपासी यंत्रणा कधी फोन करून ,व्हिडिओ कॉल करून ,चौकशी करत नाही. कुठलीही सरकारी यंत्रणा किंवा सरकारी कार्यालय फोन किंवा व्हिडिओ कॉल करून तुम्हाला कुठलेही प्रश्न विचारत नाही.

कुठल्याही तपास यंत्रणा किंवा सरकारी यंत्रणा कधी फोन करून तुमच्याकडे पैशाची मागणी करत नाहीत. त्यामुळे अशा भामट्यांना फसू नका. ✻ अशी होते फसवेगिरी तुमचा नंबर एका मनीलॉन्ड्रीच्या प्रकरणाशी संबंधित आढळला. तुम्ही दहशतवाद्यांना मदत केल्याचे दिसून येत आहे. एक पार्सल आले आहे. त्यामध्ये अमली पदार्थ आहेत.परदेशात पाठवलेल्या कुरिअरमध्ये हत्यार सापडले आहे. अटक करणार आहोत. तुमचा फोटो माहिती पेपरला येईल. सोशल मीडियावर व्हायरल केली जाईल, अशी बदनामी होण्याची भीती दाखवली जाते. नॅशनल सुरक्षेचे कारण सांगून याबाबत कोणाची मदतही घेऊ दिली जात नाही.

अशा प्रकारच्या बातम्या कमी की काय म्हणून आज दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोजी कोणाचा विश्वास सुद्धा बसणार नाही. अशा एका लंडनमध्ये पी.एचडी.केलेल्या आणि यूपीएससी परीक्षा पास झालेल्या सायबर चोरट्याची बातमी वाचनात आली. ती अशी की, लंडनमध्ये पीएचडी केलेला सायबर चोरटा अखेर अटकेत. आयआयटी प्राध्यापकांच्या नावे खाजगी विद्यापीठाला घातला अडीच कोटीचा गंडा. पुणे : रिसर्च फंडिंग अपॉर्च्युनिटी प्रोजेक्टसाठी शासनाने कोट्यावधीचा निधी मंजूर केला असून यासाठी दोन टक्के रक्कम भरायची आहे, असे सांगत माजी कुलगुरू यांच्या नावाचा वापर करून आयआयटी मुंबईच्या प्राध्यापकाच्या नावाने सायबर चोरट्याने शहरातील नामांकित खाजगी विद्यापीठाला २ कोटी ४६ लाख रुपयांना गंडा घातला होता.

विद्यापीठाच्या शैक्षणिक अधिकाऱ्यांनी सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. हा प्रकार २५ जुलै ते २६ आगस्ट दरम्यान घडला आहे. दरम्यान , पोलिसांनी या प्रकरणातील आरोपीला हैदराबाद , तेलंगणा येथून ताब्यात घेत अटक केली. सीतया किलारु वय वर्षी ३४ राहणार मेहेर रोड याप्रल हैदराबाद ) असे उच्चशिक्षित आरोपीचे नाव आहे. विशेष म्हणजे आरोपीने लंडन येथे मास्टर्स अन बर्निंगहॅम विद्यापीठातून पीएच.डी.चे शिक्षण घेतले आहे. बेटिंगच्या नादामुळे त्याने हे केल्याचे तपासात समोर आले. हा प्रकार २५ जुलै ते २६ऑगस्ट दरम्यान घडला ,अशी माहिती गुन्हे शाखेचे अप्पर पोलीस आयुक्त पंकज देशमुख यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी शहरातील खाजगी विद्यापीठात शैक्षणिक अधिकारी आहेत. त्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माजी कुलगुरूंच्या नावाने मेसेज आला. माजी कुलगुरू हे आयआयटी मुंबईचे प्राध्यापक म्हणून काम पाहत होते. २५ जुलैला मेसेज आला की, रिसर्च फंडिंग अपॉर्च्युनिटी प्रोजेक्ट करिता डॉक्टर चेतन कामत ही व्यक्ती संपर्क करील. त्यात कामत यांचा मोबाईल नंबर दिला होता. त्यानंतर त्या फोनवरून चेतन कामत नावाच्या व्यक्तीचा फोन आला. त्याने आपण आयआयटी मुंबईत प्राध्यापक असून आयआयटी मुंबई विद्यापीठात सोबत एकत्रितपणे संशोधन प्रकल्पावर काम करायचे आहे.

यासाठी शासनाच्या तीन प्रकल्पासाठी कोठ्यावधीचा निधी मंजूर झाला असून , त्यापैकी दोन टक्के रक्कम भरा असे सांगितले. यानुसार विद्यापीठाने २ कोटी ४६ लाख रुपये भरले. ✻ पीएचडी धारक , यूपीएससी पास झालेला आरोपी. सीतया किलारू हा मूळचा विजयवाडा येथील असून तो हैद्राबाद येथे वास्तव्याला आहे. २०१० ते २०१४ दरम्यान तो मास्टर डिग्रीसाठी लंडन येथे स्टेपोर्डशायर विद्यापीठात गेला. त्याने बर्मिंगहॅम विद्यापीठातून पीएचडी मिळवली. २०१५ ते २०१६ दरम्यान त्याने कोनेरू विद्यापीठ, हैदराबाद येथे नोकरी केली. २०१६ ते २०१८ दरम्यान बीआरआयटी विद्यापीठात नोकरी केली.

२०१९– २०२० मध्ये तो यूपीएससी पूर्व आणि मुख्य परीक्षा पास झाला. ऑनलाईन बेटिंगचा नाद लागल्याने२०२२ मध्ये कौटुंबिक वाद झाल्याने त्याची बायको–मुले त्याला सोडून गेली. त्यानंतर त्याने बेटिंगसाठी हा मार्ग अवलंबला. ✻ स्वतः च्या बँक खात्यात पैसे घेतल्याने सापडला. आरोपींनी आत्तापर्यंत ५ कोटी रुपये बेटिंगमध्ये घातले. बेटिंगसाठी पैसे लागत असल्याने त्याने हा पर्याय निवडला. शहरातील अन्य एका खाजगी विद्यापीठालाही त्याने मेलद्वारे संपर्क साधल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.२ कोटी ४६ लाख रुपये त्याने स्वतःच्या बँक खात्यात घेतल्याने ,पोलिसांना त्यांच्या पर्यंत पोहोचणे सोपे झाले.

पैशातून त्याने एक चार चाकी विकत घेतली, पूर्वी त्याची उधारी सासऱ्याने चुकती केली. तसेच बेटिंगमध्ये १५ ते २० दिवसांत दीड कोटी रुपये त्याने उडवले. आयआयटी मुंबई येथे संपर्क साधून चेतन कामत यांचा नंबर घेतला. त्यांच्याशी संपर्क साधल्यावर त्यांनी प्रकल्पाबाबत कोणाशीही चर्चा केली नसल्याचे सांगितले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी कुलसचिवांशी संपर्क साधून याची माहिती दिली. ही कामगिरी गुन्हेचे अप्पर पोलीस आयुक्त पंकज देशमुख ,उपायुक्त विवेक मासाळ ,राजलक्ष्मी शिवणकर , एसीपी मच्छिंद्र खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्वप्नाली शिंदे ,

निरीक्षक संगीता देवकाते , पोलीस कर्मचारी संदीप मुंडे, बाळासाहेब चव्हाण , नवनाथ कोंडे, संदीप कारकूड , टीना कांबळे ,अमोल कदम, सचिन शिंदे, सुप्रिया होळकर ,गंगाधर काळे ,शेख , सतीश मांढरे , कृष्णा मारकर यांनी केली. ✻ १० डेबिट कार्ड १२ पासबुकसह ४९ लाख ७५ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीला दिनांक २८ सप्टेंबर २०२५पर्यंत पोलीस कोठडी ठोठावली आहे. वरील बातमी वाचल्या नंतर चाले उच्च शिक्षण घेतलेला आणि यूपीएससी अवघड सारखी परीक्षा उत्तीर्ण झालेला हा हुशार व्यक्ती आपल्या ज्ञानाचा उपयोग आपल्या देशाच्या अगर स्वतःच्या कुटुंबासाठी न करता त्या ज्ञानाचा उपयोग उच्च विद्या विभूषित प्राध्यापकांना फसवत असेल तर त्या घेतलेल्या उच्च पदव्यांचा एक प्रकारे अपमान केलेला आहे. अशा उच्चविद्या विभूषित सायबर चोर...! असतात यावर कोणाचा विश्वास बसत नाही.

************

लेखक
जी.एस.कुचेकर पाटील
भुईंज तालुका वाई जिल्हा सातारा
मो.न. ७५८८५६०७६१

# फ्रान्समधील अराजक!

जगभरात सध्या नागरी असंतोष आणि उद्रेकाचे लोण पसरत चालले आहे. राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध देश म्हणून ओळखल्या जाणार्या फ्रान्समध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणावर निदर्शने झाले. प्राचीन काळापासून फ्रान्सने अनेक युद्धे, राजकीय बदल, सामाजिक चळवळी आणि सांस्कृतिक प्रगती अनुभवली आहे. १७८९ साली झालेली फ्रेंच राज्यक्रांती ही सामाजिक, आर्थिक आणि राजकीय असमानतेवर आधारित होती. या क्रांतीमुळे राजेशाही पाडली गेली आणि फ्रान्समध्ये गणराज्य स्थापन झाले. १९व्या शतकात फ्रान्समध्ये राजकीय स्थैर्य आणि औद्योगिकीकरणाचे युग सुरू झाले. युरोपातील इतर देशांसह फ्रान्सने औद्योगिकीकरणामुळे आर्थिक प्रगती साधली आणि सामाजिक बदल सुरू झाले. यानंतरच्या काळात फ्रान्सने आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला गती दिली. परंतु गेल्या वर्षभरामध्ये फ्रान्सला राजकीय अस्थिरतेने ग्रासले आहे. अलीकडेच फ्रान्समध्ये पंतप्रधान फ्रॉस्वा बायरो यांच्या सरकारचा विश्वासदर्शक ठरावात पराभव झाला आणि अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासमोर २० महिन्यांत पाच पंतप्रधान निवडण्याची नामुष्की ओढवल्याचे दिसून आले. गतवर्षी सप्टेंबर महिन्यातच गॅब्रएली अटल यांना पंतप्रधानपदावरून पायउतार व्हावे लागले होते. त्यानंतर 'ब्रेक्झिट'मध्ये चर्चेची भूमिका बजावणारे मायकेल बार्नियर यांना डिसेंबर महिन्यात हटविण्यात आले. बायरो यांच्यानंतर फ्रान्स राष्ट्राध्यक्षांनी सेबेस्टियन लेकोर्नू यांना देशाचा नवीन पंतप्रधान म्हणून नियुक्त केले आहे. लेकोर्नू हे मॅक्रॉन यांचे निकटवर्तीय असून मागील तीन वर्षे फ्रान्सचे संरक्षणमंत्री म्हणून कार्यरत होते.

# उपासना ही तत्वाची व्हावी..!

दैवी शक्ती म्हणजे ईश्वरी सामर्थ्य किंवा उच्च शक्तीची कृपा, जी सामान्यतः एखाद्या व्यक्तीच्या कल्पनेच्याही पलीकडे असते. ही शक्ती जगाला नियंत्रित करणा–या उच्च शक्तींकडून येते आणि पूर्वनियोजित घटना घडवते. अनेकदा असे मानले जाते की, जेव्हा एखादी व्यक्ती संकटातून अनपेक्षितपणे बाहेर पडते किंवा जीवनात काही अलौकिक घटना घडतात, तेव्हा ती दैवी शक्तीमुळे घडते, असे लोकं मानतात. थोडक्यात, दैवी शक्ती म्हणजे एका अज्ञात आणि शक्तिशाली अस्तित्त्वाची कृपा, जी आपल्या जीवनावर आणि घटनांवर प्रभाव टाकते. असे अनेक धर्मांमध्ये आणि अध्यात्मात मानले जाते. ही शक्ती देव किंवा एखाद्या उच्च शक्तीशी संबंधित आहे आणि त्या शक्तीचा प्रभाव दर्शवते. दैवी शक्ती नैसर्गिक नियम आणि मानवी बुद्धीच्या पलीकडे कार्य करते, ज्यामुळे अनपेक्षित गोष्टी घडतात. ही संकल्पना अध्यात्मिक आणि धार्मिक विचारांशी जोडलेली आहे, जिथे ईश्वर आणि त्याच्या शक्तीवर विश्वास ठेवला जातो. या शक्तीमुळे जीवनातील घटनांवर परिणाम होतो आणि ती व्यक्तीला संकटातून बाहेर काढण्यास मदत करते, असे मानले जाते.

ही दैवी शक्ती साक्षात स्त्रीशक्ती आहे. देवीचे पूजन करणे म्हणजे स्त्रीतत्त्वाची पूजा करण्यासारखेच आहे. कारण स्त्री ही आई, बहीण, मुलगी आणि पत्नी अशा सर्व भूमिका पार पाडणारी शक्ती आहे. त्यामुळे, दैवी शक्ती आणि स्त्रीशक्ती एकच आहेत आणि या उत्सवाचा उद्देश मातृशक्तीचा गौरव करणे आहे. नवरात्रोत्सव हा देवीच्या पूजनाचा सोहळा आहे आणि देवीला स्त्रीशक्तीचे प्रतीक मानले जाते. देवी ही केवळ एक स्त्री नाही, तर ती सर्व नाती जपणारी आणि सृजन करणारी शक्ती आहे, असे मानले जाते. जिथे नारीची पूजा होते, तिथे प्रत्यक्ष भगवंतांचा वास असतो असे म्हटले जाते. याचा अर्थ असा की, स्त्रीशक्तीची पूजा केल्याने आपोआपच सर्व देवतांचे सान्निध्य प्राप्त होते. नवरात्र हा मातृशक्तीचा उत्सव आहे, जो स्त्रीच्या सृजनशक्तीचाही उत्सव आहे. त्यामुळे, नवरात्रीत आपण दैवी शक्ती आणि समस्त नारीशक्ती या दोन्हीचा उत्सव साजरा करतो, कारण त्या एकच आहेत.

पण कोणतीही लिंग विशिष्ट पूजा आली की तिथे अहंकार येतोच आणि अहंकार आला की उपासना संपते. त्यामुळे पूजा, उपासना, साधना ही तत्वाची व्हावी, व्यक्तीची नव्हे. कारण व्यक्तींमध्ये दोष असतातच. तत्व शुद्ध, निर्लेप आणि निरपेक्ष असते. अर्थातच देवी ही शक्तीरूपच असते. पुरुष देवता या त्या विशिष्ट क्रियेचं ती क्रिया कशी व्हावी हे ज्ञान असतात, तर स्त्री देवता म्हणजे त्यांच्या ज्या पत्नी दाखवलेल्या असतात त्या ती ती विशिष्ट क्रिया पार पाडणारी शक्ती असतात. ज्ञान आणि कृती किंवा क्रिया यांचा संगम झाल्यावरच अर्थात घडल्यावरच कार्य घडते. नवरात्रीला स्त्री शक्तीचा जागर म्हणायचं असेल तर गणेश उत्सवाला, कृष्ण जन्माष्टमीला पुरुष शक्तीचा जागर म्हणायचं का? शिव शब्दात शिव हा शब्द शव या पुरुष रुपाला इ हा स्त्री लिंगी स्वर जोडून शिव हा शब्द बनला आहे. हा इ हा स्त्री उच्चारी स्वर नसेल तर शिव हे फक्त शव म्हणजेच प्रेत होईल.

लक्ष्मी ही विष्णूची शक्ती आहे जिला आपण विष्णूची पत्नी म्हणतो. सरस्वती ही ब्रह्मदेवाची कार्यकारी शक्ती म्हणजे सृष्टी कशी बनवायची हे ज्ञान ब्रह्मदेव आणि ती प्रत्यक्ष बनवण्याची शक्ती म्हणजे सरस्वती. ब्रह्म किंवा परब्रह्म ही सृष्टी बनवणा–या शक्तीचे मूळ अकल्पनिय, अचिंत्य म्हणजे आपल्याला न कळणारे अति सूक्ष्म रूप असून या शक्तीचं साकार आणि खरं भासणारं आभासी रूप म्हणजे माया होय. 'शीवी' किंवा पार्वती ही शिवशंकरांची शक्ती होय. शीवी म्हणजे ती शिवी नव्हे जिथे चुकीची वाकशक्ती, वाणी, घातक किंवा वाईट शब्द असते.

पण हा जर स्त्री शक्तीचाच उत्सव असेल तर प्रत्येक पुरुषात स्त्रियांच्या जन्माला कारणीभूत ठरणारे 'एक्स' गुणसूत्र असल्याने पुरुषांमधल्या स्त्री शक्तीचं नवरात्र हे शुद्धीकरण पर्व असतं असं आपण नक्कीच म्हणू शकतो. आपण जेव्हा जन्म घेतो तो आपण माणूस म्हणूनच का घेतो? हात, पाय, नाक, डोळे, आपल्या सवयी, आवडी निवडी या काहीशा आपल्या आई–वडिलांच्या सारख्याच का असतात? त्यांच्या सारखेच आपण का दिसतो? हे सारं आरेखित केलेलं असतं. आपल्या आई वडिलांच्या शरीरातील पेशींमध्ये गुणसूत्र रूपाने पुरुष बाळ जन्माला येण्यासाठी 'वाय' गुणसूत्र तर स्त्री बाळ जन्माला येण्यासाठी 'एक्स' गुणसूत्र आवश्यक किंवा कारणीभूत असतात. आता पुरुषांच्या शरीरातील पेशींमध्ये 'एक्स' आणि 'वाय' हे दोन्ही गुणसुत्र असतात तर स्त्रीच्या शरीरातील पेशींमध्ये फक्त 'एक्स' गुणसूत्र असतात.

आता दोघांच्या शरीरातील एक एक गुणसूत्र येऊन जोडला जाईल तेव्हा बाळाचं लिंग काय असणार हे ठरणार... पुरुषांमधलं एक्स आणि स्त्री मधलं एक्स एकत्र आलं तर मुलगी जन्माला येणार आणि जर पुरुषांमधलं वाय आणि स्त्री मधलं एक्स गुणसूत्र एकत्र आलं तर मुलगा जन्माला येणार... याचे दोन मुख्य अर्थ होतात. एक म्हणजे मुलगा होणार की मुलगी हे पुरुषामधून एक्स किंवा वाय यापैकी कोणतं गुणसूत्र दिलं जातंय यावर अवलंबून असतं. म्हणजेच दुस–या भाषेत मुलगा होणार की मुलगी याला पूर्णतः पुरुषच जबाबदार असतो आणि स्त्री मध्ये दोन्ही गुणसूत्र एक्स असल्याने ती एक कणखर व्यक्ती असते असं म्हणता येईल. अर्थात स्त्री ही पूर्णपणे स्त्री असते तर पुरुषामध्ये काही प्रमाणात स्त्रीत्व असतं. म्हणजे नवरात्र हा स्त्री शक्तीचा जर जागर असेलच तर तो पुरुषांमधल्या स्त्री शक्तीचा जागर किंवा पुरुषांमधल्या स्त्रीत्वाचं शुद्धीकरण असतं असं आपण म्हणू शकतो.

याही पुढे जायचं झालं तर देवता या वायूरूप असतात. म्हणजे आपण ज्या रूपात त्यांची आराधना करू त्या रूपात त्या आपल्याला प्रसन्न होतात किंवा दर्शन देतात. पण चित्रपटात दाखवल्याप्रमाणे वास्तविकतेत लगेच होतं असं नाही. त्यासाठी स्वत:ला झोकून देऊन उपासना करावी लागते, त्यासाठी जीव ओतावा लागतो. अर्थात अगदी आर्ततेते साद घातल्यावर देवता धावून आली आहे असंही क्वचित प्रसंगी झालेलं आहे. उदाहरण द्यायचं झालं तर जेव्हा एका हत्तीचा पाय पाण्यातल्या मगरीने पकडला होता, तेव्हा त्या हत्तीने आर्ततेने विष्णूला साद घातल्यावर त्याने धावून येऊन त्या हत्तीची सुटका केली होती. अजामिळ नावाच्या एका नास्तिक व्यक्तीला मोक्ष मिळाला ज्याने आयुष्यभर काहीही उपासना केली नाही. पण मरताना त्याच्या स्वतःच्या मुलाला नारायण म्हणून हाक मारली आणि तो मुक्त झाला. तर सांगायचं उद्देश हाच की देवता जरी माणसा सारख्या दाखवलेल्या असल्या तरी त्या प्रतिकात्मक असतात. त्या जर माणूस असत्या तर त्यांनाही आपल्यासारखे राग, लोभ, द्वेश, प्रेम वगैरे भावना असत्या.

त्यामुळे देवतांमध्ये स्त्री–पुरुष भेद न माजवता, त्याचं अवडंबर न करता स्त्री शक्तीची नव्हे तर केवळ 'शक्तीची पूजा' आपण करतोय हे लक्षात ठेवून उपासना करावी. जिथे शक्ती असेल तिथेच शांती असते. दुबळ्यांच्या गप्पांना काहीही अर्थ नसतो. तर नवरात्राच्या या काळात देवीची उपासना करून (यात स्त्री–पुरुष सगळे आलेत) आपण शरीराने आणि मनाने शक्ती संपन्न, सामर्थ्यवान व्हायला पाहिजे. आपण शक्तिमान झालो की समाजात आपल्याला मान मिळतो, हाती घेतलेल्या कामात यश मिळतं. मन आणि शरीर सुद्धा स्वस्थ, शांत राहतं. स्त्रियांनी आणि पुरुषांनी एकमेकांचा, एकमेकातील भेदांचा आदर करत एकत्र काम करायला शिकायला पाहिजे. मन आणि समाजातील वाईट गोष्टींचा नायनाट करण्यासाठी प्रयत्नशील रहायला पाहिजे. उपासना, साधना याचे अनेक अर्थ, प्रकार आहेत. हिंदू धर्म जेवढा प्राचीन आहे तेवढाच विशाल आहे.

*********

शब्दस्पर्शी–सुनील शिरपुरे
कमळवेल्ली,यवतमाळ
भ्रमणध्वनी–७०५७१८५४७९

# एवढीशी वेलची आरोग्यासाठी आहे अतिशय उपयुक्त, आहारात आवर्जून करा समावेश ठरेल फायदेशीर

वेलची केवळ चव आणि सुगंध वाढवण्यासाठीच वापरली जाते असा अनेकांचा गैरसमज आहे. चहा, गोड पदार्थ किंवा अन्य पदार्थांमध्ये मिसळला जाणारा हा छोटासा पदार्थ केवळ चविष्टच नाही तर आरोग्यासाठीही तेवढाच उपयुक्त आहे. आयुर्वेदात वेलची औषधी मानली जाते. आयुर्वेदानुसार, औषधांमध्ये, पचन सुधारण्यासाठी, तोंडाची दुर्गंधी दूर करण्यासाठी, हृदय मजबूत करण्यासाठी आणि जळजळ कमी करण्यासाठी वेलचीचा वापर केला जातो. आधुनिक संशोधनानुसारदेखील हे स्पष्ट झाले आहे.

आयुर्वेदात वेलचीला मसाल्याची राणी म्हणतात. कारण त्यात असलेले अँटी–ऑक्सिडंट्स, खनिजे आणि जीवनसत्त्वे शरीराचे अनेक आजारांपासून संरक्षण करतात. तज्ज्ञांच्या मते, दैनंदिन आहारात वेलचीचा समावेश केल्याने पचनापासून ते हृदयाच्या आरोग्यापर्यंत अनेक फायदे होतात. याचा काय परिणाम होतो ते जाणून घेऊ

हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर

वेलचीमध्ये पोटॅशियम आणि मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते. ते रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते. वेलचमधील अँटी–ऑक्सिडंट्स कोलेस्टेरॉलची पातळी संतुलित ठेवतात आणि हृदयाचे ठोके सामान्य राखण्यास मदत करतात. वेलचीचे नियमित सेवन हृदय निरोगी ठेवते आणि रोगांचा धोका कमी करू शकते. शरीरातील अतिरिक्त मीठ आणि पाणी बाहेर काढण्यास वेलची मदत करते आणि त्यामुळे हृदयावरील दबाव कमी होतो.

पचन सुधारते वेलचीचा सर्वात महत्त्वाचा गुणधर्म म्हणजे पचनक्रियेत मदत करते. त्यात असलेले सक्रिय घटक पाचक एंजाइम्स उत्तेजित करतात. त्यामुळे गॅस, आम्लता आणि पोट फुगणे यासारख्या समस्या कमी होतात. चहा किंवा खिचडीमध्ये थोडी वेलची पावडर घालावी. रात्रीच्या जेवणानंतर वेलची चावल्याने पचनक्रिया सुधारते.



श्वासातील दुर्गंधी घालवते वेलची चावण्यामागे एक रहस्य आहे. त्यात असलेले अंटी–मायक्रोबियल संयुगे तोंडातील बॅक्टेरिया नष्ट करण्यास मदत करतात. संशोधनानुसार, वेलची हिरड्यांचे आजार आणि पोकळी रोखण्यास मदत करते. जेवणानंतर एक संपूर्ण वेलची चावल्यास श्वास ताजा राहतो आणि हिरड्यांचे आरोग्यदेखील सुधारते. जळजळ आणि ऑक्सिडेटिव्ह ताणापासून संरक्षण करते वेलचीमध्ये असलेले फ्लेव्होनॉइड्स आणि फिनोलिक संयुगे जळजळ कमी करण्यास आणि शरीरातील ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करण्यास मदत करतात. हे गुणधर्म यकृताचे आरोग्य सुधारतात आणि त्वचा उजळवतात. भाज्या, सूप किंवा डाळीत वेलची पावडर घाला. तसंच सॅलड ड्रेसिंगमध्ये वेलचीचा थोडासा वापर केल्याने दाहकविरोधी प्रभाव वाढतो.

वजन कमी करण्यास उपयुक्त नवीन संशोधनानुसार, वेलची चयापचय गतिमान करते, चरबी कमी करते आणि भूक नियंत्रित करण्यास मदत करते. तसंच वेलचीमुळे यकृताचे कार्यही सुधारते.

## आतड्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी 'या' ३ बिया करतील जादू; अनेक आजारांपासून सुटका, तर झटक्यात बाहेर पडेल शरीरातील घाण

आतड्यांचे आरोग्य अलीकडच्या काळात चर्चेत विषय ठरत आहे. आतड्यांचे आरोग्य बिघडल्याने शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे अन्न तुमच्या आतड्याचे आरोग्य सुधारू शकते आणि रोग होण्यापासून तुमचा बचाव करू शकते. एम्स, हार्वर्ड व स्टॅनफोर्ड या विद्यापीठांमध्ये प्रशिक्षण घेतलेले कंटेंट क्रिएटर व गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉक्टर सौरभ सेठी यांनी अलीकडेच इन्स्टाग्रामवर याबद्दलची माहिती शेअर केली. काही बिया तुमच्या आतड्यांची काळजी घेण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, असे त्यांनी सांगितले. त्यामध्ये चिया, अंबाडी व डाळिंबाच्या बियांचा समावेश असतो.

तर या तिन्ही बियांचे कशा प्रकारे सेवन केल्यावर आतड्यांचे आरोग्य कसे सुधारू शकते हे समजून घेण्यासाठी दी इंडियन एस्क्प्रेसने आरोग्य तज्ज्ञांशी संपर्क साधला. अळशी किंवा जवसाच्या बिया भुवनेश्वर येथील केअर हॉस्पिटल्समधील वरिष्ठ आहारतज्ज्ञ गुरु प्रसाद दास यांनी सांगितले की, या बिया ओमेगा–३ चा स्रोत आहेत. त्यामुळे शरीरात तयार होत नसलेले एक आवश्यक फॅटी सिड तयार होते. म्हणूनच या बियांचे दररोज आहारातून सेवन करणे आवश्यक आहे. त्यांच्या मते, या अदभुत बियांमध्ये फायटोएस्ट्रोजेनदेखील भरपूर प्रमाणात असतात, ज्यामुळे हार्मोनल संतुलन वाढविण्यास मदत होते. त्यामुळे केवळ झउजड मध्येच मदत होत नाही, तर त्यात फायटोस्टेरॉलदेखील असतात, जे शरीरातील चांगले कोलेस्ट्रॉल सुधारण्यास आणि वाईट कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात.

या बिया शरीराला पचवणे कठीण जाते. त्यामुळे त्यांचे पचन न होताच त्या बाहेर पडू शकतात. त्यामुळे सेवन करण्यापूर्वी पहिल्यांदा त्या बारीक करा. नंतर त्यांची पावडर केल्यास शरीराला त्यातून पोषक तत्त्वे अधिक कार्यक्षमतेने शोषणे शक्य होते. तुम्ही बिया बारीक करण्यासाठी कॉफी ग्राइंडर, ब्लेंडर किंवा फूड प्रोसेसर वापरू शकता. तसेच तुम्ही दुकानातून दळलेले जवसाचे पीठदेखील खरेदी करू शकता आणि ते खराब होऊ नये म्हणून रेफ्रिजरेटर किंवा फ्रिजरमध्ये हवाबंद डब्यात साठवून देऊ शकता, असे आहारतज्ज्ञ गुरु प्रसाद दास यांनी सांगितले आहे.

चिया सीड्स चिया सीड्स लहान असतात; पण त्यात भरपूर प्रमाणात पोषक तत्त्वे असतात. म्हणूनच बरेच लोक दैनंदिन आहारात त्याचा समावेश करतात. त्यामध्ये खूप फायबर असते, ज्यामुळे पोटाचे चांगले राहण्यास मदत मिळते. जर तुम्हाला बद्धकोष्ठतेचा त्रास होत असेल, तर दररोज चिया सीड्स खाल्ल्याने तुमच्या आतड्यांसंबंधीच्या हालचाली नियंत्रित होण्यास मदत होते. पण, जर तुम्ही पुरेशा प्रमाणात पाण्याचे सेवन केले नाही, तर तुम्हाला पोटफुगीचा त्रास होऊ शकतो, अशी माहितीही आहारतज्ज्ञ गुरु प्रसाद दास यांनी दिली आहे. चिया सीड्स आतड्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर तर आहेतच. पण, त्याचबरोबर त्यात ओमेगा–३ फॅटी सिडदेखील विपुल असते, जे हृदयासाठी चांगले असते. चिया सीड्सच्या नियमित सेवनाने वाईट कोलेस्ट्रॉल आणि हृदयरोगाचा धोका कमी होण्यास मदत होते. डाळिंबाच्या बिया जिंदाल नेचरक्योर इन्स्टिट्यूटच्या मुख्य आहारतज्ज्ञ सुषमा पी. एस. यांनी सांगितले की, डाळिंबात अँटीऑक्सिडंट्स, पॉलीफेनॉल व अँथ्रोसायनिन्स या संयुगांचा मोठा साठा असतात. ही संयुगे शरीरातील मुक्त रॅडिकल्सना निष्क्रिय करण्यास मदत करतात, ज्यामुळे ऑक्सिडेटिव्ह ताण आणि जळजळ कमी होते. डाळिंब व्हिटॅमिन सी, पोटॅशियम व फायबर या आवश्यक पोषक तत्त्वांचा चांगला स्रोत आहे. डाळिंबामध्ये आहारातील फायबर असते, जे नियमित आतड्यांच्या हालचालींना समर्थन देऊन आणि बद्धकोष्ठता रोखून पचनक्रिया निरोगी ठेवण्यास मदत करतात. पुढे सुषमा यांनी नमूद केले की, डाळिंबामध्ये दाह कमी करणारे गुणधर्म असतात.

## तरुण वयात डॉक्टरांच्याच हृदयावर गदा!

मुंबई : हृदयाचे रक्षण करणारे डॉक्टरच आता हृदयविकाराला बळी पडत आहेत, अशा वेदनादायी वास्तवाची जाणीव पुन्हा एकदा झाली आहे. अलकडेच चेन्नईतील नामांकित हृदय शल्यचिकित्सकांचा वयाच्या अवघ्या ३९ वर्षी अचानक हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. या घटनेने वैद्यकीय क्षेत्रात चिंतेची लाट पसरली आहे. गेल्या दोन दशकात रुग्णांना जीवनदान देणाऱ्या डॉक्टरांमध्येच हृदयविकाराच्या घटना वाढत असल्याचे दिसून येत आहे. भारतात डॉक्टरांवर वाढलेल्या कामाचा ताणतणाव, १८ तासाहून अधिक काळ करावे लागणारे काम, झोपेची कमतरता, अनियमित आहारपद्धती, आणि व्यायामाचा अभाव ही गंभीर कारणे ठरत असल्याचे सीएमसी वेल्लोरमधील वरिष्ठ हृदयविकारतज्ज्ञांनी सांगितले. देशभरात डॉक्टरांना हृदयविकाराचा झटका आल्याच्या घटना वेगाने वाढत आहेत. दोन दशकांपूर्वी मुंबईतील ख्यातकिर्त हृदयशल्यविशारद डॉ नीतू मांडके यांचाही हृदयविकाराच्या झटक्यामुळे मृत्यू झाला होता. तरुण वयात डॉक्टर, आयटी व्यावसायिक आणि शहरांतील कामकाजाच्या ताणाखाली असलेली मंडळी अचानक हृदयविकाराने कोसळत असल्याच्या घटना चिंताजनक वेगाने वाढत आहेत. चेन्नईतील तरूण हृदयशल्यचिकित्सक डॉटरांच्या मृत्यूने हा मुद्दा पुन्हा अधोरेखित केला आहे. याबाबत आपण समाजाचे जीव वाचवतो, पण आपले आरोग्य सांभाळायला वेळ देत नाही असे मनोगत अनेक डॉक्टरांनी बोलून दाखवले आहे.नॅशनल मेडिकल जर्नल ऑफ इंडिया २०२२ च्या अभ्यासानुसार ४५ टक्के भारतीय डॉक्टर बर्नआउट सिंड्रोम च्या छायेखाली आहेत. सततची ड्युटी, रुग्णांची संख्या आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यामुळे मानसिक ताण वाढतो. हा ताण थेट हृदयविकाराचा धोका वाढवतो. परिणामी डॉक्टरांनीही आपल्या प्रकृतीची योग्य प्रकारे काळजी घेण्याची गरज असून दररोज किमान ३० मिनिटे व्यायाम, किमान सात तासांची झोप ,धूम्रपान, मद्यपान व जंक फूड टाळणे ,दरवर्षी हृदयविकार तपासणी करणे आवश्यक असल्याचे डॉक्टरांचेच म्हणणे आहे.

## बटाट्याचा मसालेदार सामोसा नाही तर हा आहे नूडल्सने भरलेला चायनीज सामोसा; नोट करा रेसिपी

इंडियन स्टाईल समोसा आपण सगळ्यांनी खाल्ला असेल, पण आजकाल चायनीज ट्विस्ट दिलेले समोसेही लोकांना खूप आवडतात. चायनीज पदार्थांमध्ये नूडल्स, भाज्या आणि सॉसेसचा वापर करून बनवलेले हे समोसे बाहेरून खुसखुशीत आणि आतून मसालेदार–टेस्टी असतात. मुलांना, तरुणांना आणि पार्टीसाठी आलेल्या पाहुण्यांना चायनीज समोसा अगदी भन्नाट लागतो. विशेष म्हणजे हे समोसे हॉटेलमध्ये खाण्यापेक्षा घरच्या घरी बनवलेले ताजेतवाने आणि हेल्दी लागतात.

चायनीज समोश्यामध्ये मुख्यतः शिजवलेले नूडल्स, गाजर, कोबी, कॅप्सिकम, स्प्रिंग अनियन अशा चिरलेल्या भाज्या, सोया सॉस, चिली सॉस, व्हिनेगर इत्यादी पदार्थांचा वापर केला जातो. हे सारण कुरकुरीत समोश्याच्या पारीत भरून तळून घेतल्यावर अप्रतिम टेस्ट मिळते. विशेष म्हणजे या समोश्याबरोबर टोमॅटो सॉस किंवा शेजवान चटणी दिल्यास खाणाऱ्यांची मजा दुप्पट होते.





शालेय टिफिन, संध्याकाळचे नाश्ते किंवा सणावाराला वेगळं काही करायचं असेल तर हा चायनीज समोसा उत्तम पर्याय ठरतो. अगदी कमी वेळात आणि सोप्या पद्धतीने बनणारा हा पदार्थ घरातील प्रत्येकाच्या चवीला रुचकर लागतो. चला तर मग पाहूया स्वादिष्ट चायनीज समोसा कसा बनवायचा.

साहित्य

१ कप मैदा

१ टेबलस्पून तेल

मीठ चवीनुसार

पाणी आवश्यकतेनुसार (पीठ मळण्यासाठी)

१ कप शिजवलेले नूडल्स

ट कप किसलेला कोबी

ट कप गाजर किसलेले

ञ कप कॅप्सिकम बारीक चिरलेले

२ टेबलस्पून स्प्रिंग अनियन

१ टीस्पून सोया सॉस

१ टीस्पून चिली सॉस

१ टीस्पून व्हिनेगर

मीठ व मिरेपूड चवीनुसार

तळण्यासाठी तेल

कृती सर्वप्रथम मैदा, मीठ व तेल घेऊन पाणी घालून घट्ट पीठ मळून घ्या व ओलसर कापड झाकून १५ मिनिटे बाजूला ठेवा.

कढईत थोडं तेल गरम करून त्यात गाजर, कोबी, कॅप्सिकम व स्प्रिंग अनियन हलकेच परता.

आता त्यात शिजवलेले नूडल्स, सोया सॉस, चिली सॉस, व्हिनेगर, मीठ व मिरेपूड घालून छान मिसळा. हे सारण तयार ठेवा.

मळलेले पीठ लहान लहान गोळे करून पारी लाटा व अर्धवट कापा. प्रत्येक अर्धवट पारीत कोन बनवून त्यात तयार केलेले नूडल्सचे सारण भरा.

# तुम्हीही वजन कमी करण्यासाठी खूप मेहनत घेताय? पण तरीही कमी होत नाही? थांबा! डॉक्टरांनी सांगितलेल्या 'या' चुका आत्ताच टाळा

थशळसहीं श्रींी ींहि: वजन वाढणे ही एक सामान्य समस्या आहे. प्रत्येक व्यक्तीला वजन वाढण्याची चिंता असते. जास्त वजनामुळे मधुमेहापासून ते रक्तदाबापर्यंत अनेक गंभीर आजारांचा धोकाही वाढतो. वाढते वजन आणि पोटाची ढेरी ही सध्याची सर्वांत मोठी समस्या बनली आहे. वाढलेलं वजन आणि पोटाची लटकणारी ढेरी तुमचे सौंदर्य तर बिघडवतेच. सोबतच आरोग्यासाठीही ते हानिकारक असते. वाढलेल्या वजनामुळे अनेक आजार होण्याचा धोका संभवतो. वाढलेलं वजन आणि पोटाची ढेरी कमी करण्यासाठी आपण अनेक उपाय करतो. वजन कमी करण्यासाठी आपण डाएट व एक्सरसाइज करतो. तुम्हीही पोट कमी करण्यासाठी प्रयत्नशील आहात; पण ते होत नाहीये का? तुम्ही डाएट आणि जिममध्ये व्यायामही करून पाहिले; पण अपेक्षित परिणाम मिळाले नाहीत? 'वजन कमी करणे' म्हणजे काय हे चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी प्रत्येकाला या पाच गोष्टी माहीत असायलाच हव्यात. वजन कमी करण्याआधी जाणून घ्या या गोष्टी १. हे आपल्या जीवशास्त्राच्या विरुद्ध आहे १९९० च्या दशकापासून इंग्लंडमध्ये लठ्ठपणाला राष्ट्रीय आरोग्यदृष्ट्या प्राधान्य देण्यात आले आहे. आणि त्यावर उपाय म्हणून अनेक धोरणे आखण्यात आली आहेत. तरीही लठ्ठपणाचे प्रमाण कमी झालेले नाही – फ्रान्समध्ये २०२० मध्ये अतिरिक्त वजनाचे प्रमाण (जास्त वजन आणि लठ्ठपणा दोन्हीसह) ४७.३% होते, ज्यामध्ये १७% लोक लठ्ठ होते. वजन कमी करण्याच्या पद्धती प्रभावी असल्या तरी त्यांचे परिणाम बहुतेकदा टिकाऊ नसतात. अभ्यासातून असे दिसून आले आहे की, बहुतेक लोक जे वजन कमी करतात, ते काही काळानंतर पुन्हा वाढते. याचं कारण असं की, जेव्हा आपण कमी प्रमाणात कॅलरी असलेल्या आहाराचे सेवन करण्याचे उद्दिष्ट ठेवून वजन कमी करतो, तेव्हा रेलिनसारखे हार्मोन्स भूक वाढवतात. ज्यामुळे आपल्याला अधिक खाण्याची इच्छा होते आणि कमी केलेले वजन पुन्हा वाढते. २. हा इच्छाशक्तीचा प्रश्न नाही शरीराचे वजन अनेक घटकांद्वारे निश्चित केले जाते. उदाहरणार्थ– आपण किती लवकर कॅलरी बर्न करतो, आपल्याला किती भूक लागते आणि खाल्ल्यानंतर आपल्याला किती पोट भरल्यासारखे वाटते यावर अवलंबून असते. काही लोकांना आनुवंशिकदृष्ट्या भूक लागण्याची आणि सारखे खाण्याची सवय असते, ज्यामुळे वजन कमी करणे आणखी कठीण होते. त्यासोबतच सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपला आहार, व्यायाम व पुरेशी झोप हेसुद्धा तितकंच महत्त्वाचं आहे. ३. फक्त कॅलरीजवर सर्व काही अवलंबून नसतं कॅलरीज मोजणे ही वजन कमी करण्यासाठी वापरली जाणारी प्रसिद्ध पद्धत आहे. मात्र, आपण अन्न कसे शिजवतो, पचवतो यावर आपल्या आतड्यांतील जीवाणूंची रचना अवलंबून असते. त्यानुसार आपण किती ऊर्जा शोषतो हेदेखील बदलू शकते. 'कॅलरीज ही एक कॅलरी असते' असा एक कायमचा गैरसमजदेखील आहे; परंतु आपले शरीर सर्व कॅलरीजवर सारख्याच प्रकारे प्रक्रिया करीत नाही. आपली भूक, पचन आणि ऊर्जेची पातळी यांवर खूप वेगळे परिणाम होतात. या गैरसमजांमुळे प्रोटीन शेकचा आहार किंवा काही अन्न गट पूर्णपणे काढून टाकणाऱ्या आहाराचे फॅड निर्माण झाले आहे. मात्र, दीर्घकालीन बदलांवर लक्ष केंद्रित करणे हा अधिक वास्तववादी आणि संतुलित दृष्टिकोन आहे. ४. व्यायाम आरोग्यासाठी उत्तम; पण वजन घटवण्यासाठी अनावश्यक जितका जास्त व्यायाम करू, तितके जास्त वजन कमी होईल, असा विश्वास बऱ्याच लोकांना वाटत असतो; परंतु विज्ञान आपल्याला दाखवते की, वास्तव अधिक गुंतागुंतीचे आहे. आपले शरीर ऊर्जा वाचवण्याच्या दृष्टीने खूप चांगला प्रतिसाद देत असते. तीव्र व्यायामानंतर आपण नकळतपणे दिवसभर कमी हालचाल करतो किंवा भूक लागू शकते आणि जास्त खाऊ शकतो, ज्यामुळे बर्न झालेल्या कॅलरीज पुन्हा वाढतात. खरं तर, संशोधनातून असे दिसून आले आहे की, वाढत्या शारीरिक हालचालींमुळे एकूण दैनंदिन ऊर्जेचा वापर वाढत नाही. त्याऐवजी शरीर अधिक कार्यक्षम होऊन आणि इतरत्र त्याचा ऊर्जेचा वापर कमी करते, ज्यामुळे केवळ व्यायामाद्वारे वजन कमी करणे शक्य होत नाही. असे असले तरी व्यायामाचे अजूनही अनेक फायदे आहेत : ते हृदय व रक्तवाहिन्यासंबंधीचे आरोग्य, मानसिक आरोग्य सुधारते, स्नायूंचे प्रमाण राखते, चयापचय मजबूत करते, हाडे मजबूत करते आणि दीर्घकालीन आजारांचा धोका कमी करते. ५. आरोग्य सुधारणे म्हणजे नेहमीच वजन कमी करणे असे नाही आरोग्यदायी राहण्यासाठी तुम्हाला वजन कमी करण्याची गरज नाही. योग्य जीवनशैली योग्य आहारानं निरोगी राहता येतं. अभ्यासातून असेही दिसून आले आहे

# नदीच्या पुराने वेढलेल्या आरजखेडा येथील नागरिकांना ऋषिकेश कराड यांचा दिलासा





लातूर :– गेल्या काही दिवसापासून सततच्या पावसाने शेतातील उभ्या पिकाचे प्रचंड नुकसान झाले आणि गावालगत असलेल्या मांजरा नदीच्या पूर परिस्थितीमुळे रेणापूर तालुक्यातील मौजे आरजखेडा हे गाव मोठ्या संकटात सापडले. गावच्या तिन्ही बाजूंनी गावात पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले. या नुकसानीची पाहणी करून भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी या नुकसानग्रस्त शेतकऱ्यासह ग्रामस्थांशी संवाद साधला. राज्यातील महायुती शासन आणि आपले आमदार महोदय रमेशआप्पा आपल्या पाठीशी आहेत असा दिलासा दिला.

रेणापूर तालुक्यातील मौजे आरजखेडा या गावात जिकडे तिकडे पाणीच पाणी झाले आहे. गेल्या काही दिवसापासून होत असलेल्या सततच्या पावसामुळे आणि गावालगत असलेल्या मांजरा नदीच्या पात्रात धरणातील सतत पाणी सोडल्याने नदीला मोठा पूर आला या पुराचे पाणी गावाच्या तिन्ही बाजूने गावात शिरले. अनेक घरांमध्ये पाणी जाऊन मोठे नुकसान झाले. पुरामुळे मांजरा नदीवरील पूल पाण्याखाली गेल्याने लातूरला जाणारा आणि रेणापूरकडे जाणारा रस्ता बंद झाल्याने गावचा संपर्क तुटला शिवाय गाव पूर्णपणे पाण्याने वेढले गेले त्यातच वीज पुरवठा खंडित झाला होता.

अत्यंत संकटात सापडलेल्या या गावाला भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी बुधवारी भेट देऊन ज्या घरात पाणी शिरले होते त्या घराची व इतर नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासमवेत भाजपाचे दशरथ सरवदे, श्रीकृष्ण पवार, दिलीप पाटील, लक्ष्मण खलंग्रे, राम बरीदे, सरपंच कुलदीप सूर्यवंशी, उपसरपंच भालचंद्र सूर्यवंशी यांच्यासह इतर अनेक जण होते.

युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी गावातील लोकांशी संवाद साधून विचारपूस केली अडीअडचणीची चौकशी केली. लाईट बंद असल्यामुळे पिण्याच्या पाण्याची मोठी अडचण झाल्याने तेथे संबंधितांना तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची सूचना करून पाण्याची सोय केली. शेतात अडकलेल्या लोकांची चौकशी केली या एकूण परिस्थिती बाबत अरजखेडा गावातून तहसीलदार थोरात यांना फोनद्वारे व्हिडिओ कॉल करून परिस्थिती दाखवून संपूर्ण माहिती दिली.

खरिपाची सर्व पिके हातातून गेली नैसर्गिक नुकसान कसेही भरून काढता येईल मात्र एखादी जीवित हानी झाली तर कशानेही भरून निघणार नाही तेव्हा नागरिकांनी सतर्क राहून कोणीही पुराच्या पाण्यात जाऊ नये सकल भागातील रहिवाशांनी सावधानता बाळगावी आपला जीव आणि पशुधन सुरक्षित कसे राहील यासाठी प्रत्येकाने काळजी घ्यावी असे आवाहन करून राज्यातील महायुती शासन आपल्या पाठीशी आहे आपल्या मतदारसंघाचे आमदार रमेशआप्पा कराड साहेब आपल्या संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत सर्व नुकसान ग्रस्तांना शासनाकडून भरीव मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत असे ऋषिकेशदादा कराड यांनी बोलून दाखवले.

यावेळी अरजखेडा येथील राजेभाऊ सूर्यवंशी, रामचंद्र नामदेव सूर्यवंशी, गोपाळ रावसाहेब सूर्यवंशी, बजरंग भाऊसाहेब सूर्यवंशी, खंडू जोगदंड, नवनाथ जोगदंड, हरिश्चंद्र सूर्यवंशी, बालासाहेब सूर्यवंशी, वजीर पठाण, नजीर पठाण, बाळासाहेब भालचंद्र सूर्यवंशी, नवनाथ सूर्यवंशी, ज्ञानेश्वर सूर्यवंशी, सुनील सूर्यवंशी, नाथराव सूर्यवंशी, सचिन सूर्यवंशी, आत्माराम सूर्यवंशी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने होते.

## केज शहरात कन्हैय्या इव्हेंन्टस् कडून दांडिया महोत्सवाचे आयोजन

केज/प्रतिनिधी नवरात्र उत्सवाचे औचित्य साधून केज शहरामध्ये कन्हैय्या इव्हेंन्टस् यांच्याकडून उत्सव फंक्शन हॉल, देशमुख कॉम्पलेक्स,कानडी रोड,केज येथे दि.२६,२७,२८ सप्टेंबर २०२५ दरम्यान रोज सायंकाळी ७–०० ते १०–०० यावेळेत दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.या महोत्सवा दरम्यान महिलांसाठी नाममात्र १०० रू.प्रवेश शुल्कासह विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.तीन दिवसीय महोत्सवामध्ये महाराष्ट्रीयन मराठमोळी ड्रेसिंग दांडिया,रंगीलो गुजरात व रंगीलो राजस्थान या स्पेशल थीम वर दांडिया घेण्यात येणार आहेत. तसेच दांडिया महोत्सवात दांडिया थीम सह महिलांसाठी विविध सेल्फी पॉईंटस्, आकर्षक विद्युत रोषणाई,सांऊड सिस्टम व डेकोरेशन करण्यात येणार आहे.या दांडिया महोत्सवात मर्यादित ४० महिलांनाच प्रवेश देण्यात येणार आहे.तसेच सहभागी महिलांना सन्माचिन्ह देवून यथोचित सन्मान करण्यात येणार असल्याचे कन्हैय्या इव्हेंटस् चे संचालक रोहन वेदपाठक यांनी सांगितले.महिलांच्या सुरक्षिततेसाठी कन्हैय्या इव्हेंटस् यांच्या कडून पूर्ण तयारी करण्यात आली आहे.

## बेपत्ता रबाले पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदाराचा मृतदेह तळोजा खडीत आढळून आला..!

### पोलीस खात्यात एकच खळबळ..!!

नवी मुंबई / के. एच. हनवते :– महाराष्ट्र पोलीस पोलीस खात्यामध्ये नोकरीस असलेले पोलीस अंमलदार : सोमनाथ काशिनाथ फापाळे वय वर्ष (३१) या पोलिसाचा मृत्यू देह तळोजा येथील खाडीत आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे पोलीस अंमलदार सोमनाथ फापाळे हे रबाले पोलीस ठाण्यात कार्यरत होते दिनांक ४ /९ / २०२५ रोजी झोन वन स्ट्रायकिंगचे गाडीवर वाशी येथे आपले कर्तव्य बजावत असताना ते दिनांक ५/९/२०२५ सकाळी साडेसातच्या दरम्यान सकाळी कोणाला काही न सांगता अचानक निघून गेले होते याबाबत वाशी पोलीस ठाण्यात मिसिंग तक्रार नोंदविण्यात आली होती इतरत्र कुठेही तपास करून देखील पोलीस अंमलदार सोमनाथ फापाळे यांचा शोध लागत नव्हता शेवटी मंगळवार दिनांक २३/९/ २०२५ रोजी दुपारच्या दरम्यान त्यांचा मृतदेह कळंबोली पोलीस स्टेशनच्या हद्दीत मार्बल मार्केटच्या बाजूच्या खाडीत आढळून आलेला आहे अगदी अठरा दिवसानंतर बॉडी आढळून येते, एखादा पोलीस अंमलदार या प्रशासनात गायब होतो आणि काही कालांतराने त्यांची बॉडी मिळते तपास करण्यासाठी पोलिसांचा एवढा हलगर्जीपणा कसा होतो..? असा प्रश्नचिन्ह ऐड. सुनील गायकवाड यांनी उपस्थित केला आहे, कार्यरत पोलीस अंमलदार या प्रशासनात सुरक्षित नसून येथे आम जनतेचे काय..? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडला आहे. या संदर्भात पुढील अधिक तपास कळंबोली पोलीस करीत आहेत.

## केज येथील तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेस खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद



केज/प्रतिनिधी शहरालगत असलेल्या माऊली विद्यापीठ संचलित भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालयाच्या मैदानावर तालुकास्तरीय दोन दिवसीय कबड्डी स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धेत खेळाडूंनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. महाराष्ट्र शासन क्रीडा विभाग आणि केज तालुका क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालयाचे डॉ.हनुमंत सौदागर हे उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ.हनुमंत सौदागर म्हणाले खेळामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो विद्यार्थ्यांनी कौशल्य आणि सराव याचा वापर केल्यास यश निश्चित मिळते असे मत व्यक्त केले. विजेत्या संघाचे अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या क्रीडा स्पर्धेत ४५ हुन अधिक संघांनी सहभाग नोंदवला. मुलांच्या १४ वर्षे वयोगटात आश्रम शाळा टाकळी यांच्या संघाने प्रथम तर, महा. वि. बनसारोळा संघ द्वितीय, १७ वर्षे वयोगटात कर्मवीर मा. वि. चिंचोली (माळी) प्रथम तर स्वामी वि. वि. सोनीजवळा द्वितीय आणि १९ वर्षे वयोगटात हनुमान वि. विडा हा संघ प्रथम ठरला तर मुलींच्या १४ वर्षे वयोगटात जीवन शि. केज प्रथम तर महा. वि. बनसारोळा द्वितीय आणि १७ वर्षे वयोगटात स्वामी वि. वि. सोनीजवळा प्रथम तर जि. प. मा. शा.नाव्होली हा संघ द्वितीय ठरला. यावेळी विजेत्या संघाचे अभिनंदन करण्यात आले.

स्पर्धेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून केज ता. क्रीडा अधिकारी श्रीमती राखी यादव,श्री.शेप ए.पी.,श्री.बरडे डी.एस.,श्री. एम.गिरी यांनी काम पाहिले तर स्पर्धेचे पंच म्हणून,श्री.शेंडगे, श्री.कांबळे,श्री. पत्रावळे,श्री. तोंडसे,श्री.सुरवसे,आकाश घुले सर इ. काम पहिले. स्पर्धा संपन्न होण्यासाठी सर्व क्रीडा यशस्वी करण्यासाठी शिक्षकांनी सहकार्य केले.

## लातूर शहर मनपा हद्दीतील शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीचा मोबदला टीडीआर स्वरूपात घ्यावा : इंजि. राजकुमार नाईकवाडे

लातूर : लातूर शहर महानगरपालिकेची विकास योजना ( डेव्हलपमेंट प्लॅन ) मंजूर होऊन १० वर्षांपेक्षा जास्त कालावधी उलटून गेलेला आहे. परंतु अद्यापपर्यंत रस्ता किंवा आरक्षणासाठी अधिग्रहित केलेल्या जमिनीचा कुठलाही मोबदला संबंधित शेतकऱ्यांना मिळालेला नाही. ज्यांच्या जमिनी रस्ता आरक्षणात गेल्या आहेत अशा लातूर शहर मनपा हद्दीतील संबंधित शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीचा मोबदला टीडीआर स्वरूपात घ्यावा, असे आवाहन इंजिनिअर तथा मा. मनपा सल्लागार अभियंता राजकुमार नाईकवाडे यांनी केले आहे.

लातूर शहर महानगरपालिकेने खासगी अभियंत्याद्वारे बांधकाम परवाने देण्याचा महत्वपूर्ण निर्णय नुकताच घेतला आहे. मनपा आयुक्त मानसी मीना यांच्या अध्यक्षतेखाली मनपामध्ये पार पडलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीस मनपाचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, सहायक संचालक नगर रचना अनिकेत महाजन, सहायक नगर रचनाकार ऐश्वर्या ढोकळे, क्रेडाईचे अध्यक्ष उदय पाटील, राजकुमार नाईकवाडे , अभिजित देशपांडे यांसह मनपाकडे नोंदणीकृत असलेले अभियंते उपस्थित होते. मनपाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत खासगी अभियंत्यांमार्फत लो रिस्क अंतर्गत १५० चौ.मी. . भूखंडधारकांना ग्राऊंडसह दोन मजल्यांचे बांधकाम करण्याचा तसेच मॉडरेट रिस्क अंतर्गत १५१ ते ३०० चौ. मी.चे बांधकाम परवाने देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाचे बांधकाम व्यावसायिकांकडून तसेच खळगी अभियंत्यांकडून स्वागत करण्यात येत आहे. यामध्ये चुकीच्या पद्धतीने काम झाल्यास दोन्ही संबंधितांवर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.



या बैठकीस उपस्थित असलेले अभियंता राजकुमार नाईकवाडे यांनी बैठकीत ट्रान्सफरेबल डेव्हलपमेंट राईटस – टीडीआर ( हस्तांतरणीय विकास हक्क ) संदर्भात अभ्यासपूर्ण विवेचन केले. मनपा प्रशासनाने संबंधित शेतकऱ्यांना टीडीआर देण्याचे मान्य केले आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी यामध्ये गेल्या आहेत, त्यांनी टीडीआर चा लाभ घ्यावा, असे आवाहनही नाईकवाडे यांनी केले असून या संदर्भात कोणाला काही अडचण आल्यास त्यांनी आपल्याशी भ्रमणध्वनी क्रं . ९५११४ ०४४४४ वर संपर्क साधावा, असे आवाहनही इंजि. राजकुमार नाईकवाडे यांनी केले आहे.

## होळ व बनसारोळा महसूल मंडळामध्ये अतिवृष्टीमुळे शेतकर्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान




केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील होळ व बनसारोळा महसूल मंडळामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकर्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे.त्यामुळे शेतकरी सध्या संकटामध्ये सापडलेले आहेत शेतकऱ्यांच्या संसार हे उघड्यावर येऊन उद्धस्त झालेले आहेत. यामुळे शासनाने तात्काळ दखल घेऊन ओला दुष्काळ जाहीर करावा व शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी पन्नास हजार रुपये मदत तसेच संपूर्ण पीकविमा लागु करण्यात यावा अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे तहसीलदार केज यांच्याकडे केली आहे. तसेच मागणी मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा प्रशासनाला लेखी निवेदनाच्या माध्यमातून दिला आहे. यावेळी केज तहसील चे तहसीलदार राकेश गड्डे यांनी शेतकऱ्यांना सांगितले की, यावर लवकरात लवकर शक्य ती मदत शेतकर्यांना करण्यात येईल असे आश्वासन दिले. यावेळी युवानेते मा. संग्राम (भैय्या) शिंदे, ड. राजेश शिंदे, सुनील (बापू) देशमुख यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

## महसूल राज्यमंत्री योगेश कदम नुकसान पाहणीसाठी शेतकऱ्यांच्या बांधावर

लातूर :– राज्याचे महसूल तथा गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी आज रेणापूर व लातूर तालुक्यातील पूरग्रस्त भागाची, तसेच अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांनी सुमारे दीड ते दोन किलोमीटर चिखल तुडवत प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जावून शेतपिकांची पाहणी केली. राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला असून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत करण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. रेणापूर तालुक्यातील मोरवड, मोटेगाव, भोकरंबा, पोहरेगाव आणि आरजखेडा येथे अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसान पाहणी प्रसंगी औसा रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार प्रशांत थोरात, गट विकास अधिकारी सुमित जाधव, ड. बळवंतराव जाधव, सचिन दानी यांच्यासह नुकसानग्रस्त शेतकरी, नागरिक व पदाधिकारी उपस्थित होते. तसेच लातूर तालुक्यातील साखरा, मांजरी व मुरूड अकोला येथील पाहणी प्रसंगी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे–विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, गट विकास अधिकारी श्याम गोडभरले आदी उपस्थित होते. मांजरा नदीच्या पुरामुळे वाहून आलेल्या गाळाचा चिखल तुडवत, कधी ट्रॅक्टरमध्ये बसून शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचत महसूल राज्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकून घेतल्या. तीन तीन दिवस पुराच्या पाण्यात राहिलेल्या सोयाबीन, रेशीम आणि ऊस पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे सांगून राज्यमंत्री श्री. कदम यांनी शेतकऱ्यांना धीर दिला. सप्टेंबर महिन्यात झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करावेत. खरडून गेलेल्या जमिनीचा वेगळा सर्व्हे करावा. पुरामुळे नुकसान झालेल्या रस्ते, पूल, शिवरस्त्यांच्या दुरुस्तीसाठी आवश्यक कार्यवाही तातडीने करावी, अशा सूचना त्यांनी यावेळी प्रशासनाला दिल्या. अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करताना महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांनी रेणापूर तालुक्यातील आरजखेडा येथे शेतातच झाडाखाली बसून शेतकऱ्यांसोबत संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. तसेच या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या.

## कार्य तत्पर पोलिसांनी आत्महत्या करणाऱ्या मुलीचे वाचविले प्राण.

लातूर :– कार्य तत्पर पोलिसांनी आत्महत्या करणाऱ्या मुलीचे वाचविले प्राण.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक २४/०९/२०२५ ते २५/०९/२०२५ रोजी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास लातूर पोलिसांच्या डायल ११२ वर फोन आला की, एक मुलगी मौजे बुधोडा शिवारातील खदानीमधील पाण्यामध्ये उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न करीत आहे अशी माहिती मिळाली. त्यावरून डायल ११२ कक्षामधील पोलीस अधिकारी अंमलदारांनी विनाविलंब सदरची माहिती लातूर ग्रामीण व औसा पोलीस ठाण्याच्या पेट्रोलिंगवर असलेल्या पोलिसांना कळविली. पेट्रोलिंग वरील पोलीस अधिकारी व अंमलदारानी घटनेची संवेदनशीलता ओळखत काही मिनिटातच सदर ठिकाणी पोहोचले. त्यावेळी खदानीच्या पाण्यामध्ये एक तरुणी बुडत असताना आरडाओरडा करताना दिसून आली लागलीच पोलीस ठाणे औसाचे व पेट्रोलिंग वर असलेले पोउपनी अतुल डाके यांच्यासोबत असलेले पोलीस अंमलदार व होमगार्ड यांनी पाण्यामध्ये उडी टाकून बुडत असलेल्या तरुणीला पाण्याबाहेर काढले त्यामुळे त्या तरुणीचे प्राण वाचले आहे.

एकंदरीत आत्महत्या करीत असलेल्या तरुणीची माहिती मिळताच लातूर पोलिसांच्या डायल ११२ तसेच पोलीस ठाणे लातूर ग्रामीण व पोलीस ठाणे औसा च्या येथील कर्तव्यावर असलेल्या पोलिसांनी अतिशय तात्काळ व वेगवान हालचालीमुळे, तसेच तिन्ही शाखेचे आपसामधील उत्कृष्ट संपर्क व संवेदनशीलता यामुळेच आत्महत्या करणाऱ्या तरुणीचे प्राण वाचले आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी डायल ११२ कक्ष, पोलीस ठाणे औसा, पोलीस ठाणे ग्रामीण येथील कर्तव्यावर असलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदारांचे कौतुक केले आहे.

## मनपा इतिहासात पहिल्यांदाच शहर अभियंता पदावर महिला अधिकारी ऋमनपा आयुक्त श्रीमती मानसी यांचा ऐतिहासिक निर्णय

लातूर /प्रतिनिधी : लातूर शहर महानगर पालिका अंतर्गत विविध विभागात अनेक महिला अधिकारी कर्मचारी कार्यरत आहेत . व त्याना दिलेले जबाबदारी सक्षमपणे पार पाडत आहेत. नुकतेच आयुक्त पदी सुध्दा श्रीमती मानसी यांची नियुक्ती शासनाने केली आहे व त्या लातूर महानगरपालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त म्हणून सक्षमपणे कार्यरत आहेत. नुकतेच शहर अभियंता हे पद रिक्त झाल्याने मनपा सेवेतील सेवाजेष्ट अभियंता असलेल्या श्रीमती उषा काकडे यांची शहर अभियंता पदी नियुक्ती मनपा आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी केली आहे . ऐन नवरात्री मधे महापालिकेतील शहर



अभियंता सारख्या जबाबदार पदाचा कारभार महिला अधिकारी यांच्या कडे सोपवून महिला सक्षमीकरणाचा संदेश मनपा प्रशासनाने दिला आहे. श्रीमती उषा काकडे यांनी शहर अभियंता पदाचा पदभार स्वीकारून कामास सुरुवात केली आहे याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ पंजाबराव खानसोळे यांच्या सह अधिकारी कर्मचाऱ्यांनी श्रीमती उषा काकडे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE